cmyk

## संपादकीय

### राणा भारताच्या ताब्यात

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणण्यात यश आले आहे. अमेरिकेकडून त्याच्या प्रत्यार्पणाला हिरवा कंदिल मिळाल्यानंतर भारतीय पथकाने त्याला अमेरिकन 'गल्फस्ट्रीम जी-५५०' या विमानाने दिल्लीच्या पालम विमानतळावर आणले. त्यानंतर मूळचा पाकिस्तानी आणि नंतर कॅनडाचा नागरिक असलेल्या तहव्वूर राणा याला थेट राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मुख्यालयात नेण्यात आले. यावेळी मुख्यालयाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाचे भारताकडे प्रत्यार्पण केल्यानंतर पाकिस्तानने आपले हात झटकले आहेत.


दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शेतकरी ओळखपत्र क्रमांक म्हणजे सरकारचा डाव

मुंबई : राज्य सरकारने कृषी विभागाच्या योजनांसाठी १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक केला आहे. यावरून माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी संशय व्यक्त केला आहे. ॲग्रीस्टॅक योजनेच्या नावाखाली कॉर्पोरेटला शेतकऱ्यांचा डेटा उपलब्ध करून देण्याचा कट असल्याचा संशय नवले यांनी व्यक्त केला आहे. तसेच राज्य सरकारच्या धोरण लकव्यावर नवले यांनी टिका केली आहे.राज्यात कर्जमाफीवरून शेतकऱ्यांची नाराजी आहे, यावर नवले यांनी बोट ठेवलं आहे. नवले म्हणाले,''एक रुपयांत पीक विमा योजना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातल्या कर्जमाफीचा पत्ता नाही. बळिराजाच्या विविध योजनांना कात्री लागत आहे. तरीही योजनेचा लाभ देण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष -४ | अंक-३५० | मंगळवार, दि.१५ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# देशात ट्रॅक्टर विक्रीत ८ टक्के वाढ

## शेतकऱ्यांची ट्रॅक्टर खरेदीला पसंती

मुंबई । प्रतिनिधी

**देशातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात पावसाने साथ दिली. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशांतर्गत ट्रॅक्टर विक्रीत ८ टक्के वाढ झाली आहे. तसेच ट्रॅक्टरच्या निर्यातीसह उत्पादनात वाढ झाली आहे, असं ट्रॅक्टर ॲण्ड मेकॅनायझेशन असोसिएशनची आकडेवारीवर स्पष्ट झालं आहे.**

खरीपात मॉन्सूनच्या पावसाने साथ दिल्याने शेतकऱ्यांच्या पिकांची वाढ चांगली झाली. देशातील बहुतांश जलाशय पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे रब्बी हंगामात पाण्याची टंचाई निर्माण झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर खरेदीला पसंती दिली. परंतु देशातील प्रमुख शेतीमालाचे पडलेल्या दरामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी आता पाहायला मिळत आहे. परिणामी शेतकऱ्यांकडून ट्रॅक्टरचे हप्ते लांबणीवर



पडल्याचं शेतकरी सांगतात. देशातील २०२३-२४ या आर्थिक वर्षात मॉन्सूनने साथ दिली नव्हती. त्यामुळे ट्रॅक्टरची विक्री ८ टक्क्यांनी घटली होती. परंतु २०२४-२५ मध्ये मॉन्सूनमध्ये पावसाने दमदार हजेरी लावून शेतकऱ्यांना दिलासा दिला. त्यामुळे उत्पादकता काहीशी सुधारली. परिणामी सणांच्या काळात शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर खरेदीला पसंती दिल्याचं चित्र पाहायला मिळालं. तसेच देशातील ट्रॅक्टर उद्योगाच्या निर्यातीसह उत्पादनात वाढ झाली आहे. मागील वर्षी देशांतर्गत ट्रॅक्टरच्या उत्पादनात २२ टक्के घट झाली होती. परंतु यंदा मात्र १० लाख ट्रॅक्टर उत्पादनाचा टप्पा उद्योगाने ओलांडला आहे. देशांतर्गत ट्रॅक्टरची विक्री आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ८ लाख ६७ हजार २३७ युनिट्सवर होती. परंतु आर्थिक वर्ष २०२५ मध्ये मात्र ट्रॅक्टरची देशांतर्गत विक्री ९ लाख ३९ हजार ७१३ युनिट्स वर पोहचली आहे. मागील १० वर्षाच्या तुलनेत २०२५ मध्ये देशाच्या पश्चिम, दक्षिण आणि मध्य भागातील जलाशयात पाणीसाठा चांगला राहिला. तसेच रब्बीच्या सुरुवातीला ला निनाला पोषक स्थिती निर्माण झाली. त्यामुळे शेतकऱ्यांनी टॅक्टर खरेदीकडे मोर्चा वळवला. परिणामी २०२५ च्या आर्थिक वर्षात चौथ्या तिमाहीमध्ये ट्रॅक्टरच्या मागणीत वाढ पाहायला मिळाली होती. देशात महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, सोनालिका ट्रॅक्टर्स, एस्कॉर्ट्स कुबोटा यासारख्या ट्रॅक्टर उत्पादनात अग्रेसर कंपन्या आहेत. २०२५ च्या आर्थिक वर्षात महिंद्राने ट्रॅक्टर विक्रीत १२ टक्के वाढ नोंदवत ४ लाख ७ हजार ९४ युनिट विक्री केली आहे. तर सोनालिका ट्रॅक्टर्सने ७ टक्के वाढीसह १ लाख २३ युनिट्सची विक्री केली आहे. तसेच एस्कॉर्ट्स कुबोटाने १.६ टक्क्यांच्या किरकोळ वाढीसह १ लाख १० हजार ५६३ युनिट्सची विक्री केली आहे. परंतु मार्च महिन्यात मात्र एस्कॉर्ट्स कुबोटाने ट्रॅक्टर विक्रीत १५ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. मार्चमध्ये सणांच्या मुहूर्तावर ट्रॅक्टरच्या खरेदीला शेतकऱ्यांनी पसंती दिली. मार्च महिन्यात ७९ हजार ९४६ ट्रॅक्टर युनिटची विक्री झाली. मागील वर्षी याच कालावधीत केवळ ६३ हजार ७५५ युनिट्सची विक्री झाली होती. त्यामुळे ट्रॅक्टर विक्रीत वाढीचं चित्र पाहायला मिळालं. पान २ वर

### चोरीच्या प्रकरणात आरोपीऐवजी न्यायाधीशाचा शोध केला सुरू

लखनौ । वृतसंस्था

उत्तर प्रदेश पोलिसांच्या एका हास्यास्पद कामगिरीची सध्या देशभरात चर्चा सुरु आहे. उत्तर प्रदेशात पोलिसांनी एका आरोपीला अटक करण्याऐवजी चक्क महिला न्यायाधीशाला ताब्यात घेण्यासाठी कारवाई सुरु केली होती. काही वेळासाठी महिला न्यायाधीशाला हा सगळा प्रकार बघून धक्काच बसला होता. मात्र त्यानंतर महिला न्यायाधिशाने पोलिस कर्मचा-यांची चांगलीच खरडपट्टी काढली.

उत्तर प्रदेशातील आग्रामध्ये एका पोलिस अधिका-याने निष्काळजीपणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. पोलिस अधिका-याने चोरीच्या आरोपींना शोधण्याऐवजी थेट न्यायालयाच्या न्यायाधीशांना आरोपी बनवले. बार अँड बेंचच्या वृत्तानुसार, न्यायालयाने चोरीचा आरोपी राजकुमार उर्फ पप्पूविरुद्ध सीआरपीसीच्या कलम ८२ अंतर्गत अजामीनपात्र वॉरंट जारी करुन न्यायालयात हजर राहण्यासाठी निर्देश दिले होते. मात्र संबधित अधिका-याने आपले डोके वापरुन हा आदेश जारी करणा-या महिला न्यायाधिशालाच आरोपी बनवले. उपनिरीक्षक बनवारीलाल या अधिका-याने अजामीनपात्र वॉरंट घेऊन न्यायाधीश नगमा खान यांचा शोध सुरु केला. २३ मार्च रोजी जेव्हा हा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला तेव्हा हा धक्कादायक खुलासा झाला. पोलिस अधिका-याने अहवालात पान २ वर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजपरिवर्तनाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावेत-राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई । प्रतिनिधी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजपरिवर्तनाचे, सामाजिक, आर्थिक समतेवर आधारित समाजाचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी केले. चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव सुजाता सैनिक, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, यांची प्रमुख उपस्थिती होती.**

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, डॉ. बाबासाहेबांना भारताच्या संविधानाचे शिल्पकार, महान समाजसुधारक आणि देशभक्त म्हणून गौरविले जाते. बाबासाहेबांनी लोकशाही, सामाजिक समता व लिंग समानतेसाठी दिलेल्या योगदानाची त्यांनी प्रशंसा केली.राज्यपाल महोदयांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेताना संविधानालाच आपले मार्गदर्शक मानले. इंदू मिल येथे उभारण्यात येणारे डॉ. आंबेडकर स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे ठणकावून सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मुंबई आणि महाराष्ट्र हे एकमेकात रमलेले आहे. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. बाबासाहेब पान २ वर

# जिल्हा रुग्णालयाचा कारभार चव्हाट्यावर!

## पुन्हा एकदा मातेचा मृत्यू; आठवड्यातील दुसरी दुर्दैवी घटना,पालकमंत्र्यांनी लक्ष देण्याची गरज

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रविवारी एका मातेचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, सोमवारी पुन्हा एका मातेने प्राण गमावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या या मृत्यूमुळे जिल्हा रुग्णालयातील व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आठवड्यातील ही तिसरी माता मृत्यूची घटना आहे.

रूक्मीन परशुराम टोणे (वय ३५, रा. पांगरबावडी, ता. व जि. बीड) असे मृत मातेचे नाव आहे. त्या १३ एप्रिल रोजी सकाळी १०:१३ वाजता जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्यानंतर अवघ्या दीड तासांत, ११:४० वाजता त्यांच्यावर शस्त्रक्रियेने प्रसूती (सिझर) करण्यात आली. त्यांनी २३०० ग्रॅम वजनाच्या बाळाला जन्म दिला. ही त्यांची चौथी प्रसूती होती. प्रसूतीनंतर त्यांना आयसीयू विभागात उपचारासाठी ठेवण्यात आले होते. मात्र, १४ एप्रिल रोजी सकाळी ६:२५ वाजता उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदनही जिल्हा रुग्णालयातच करण्यात आले. माहितीनुसार, रूक्मीन टोणे यांना हृदयविकारासह इतर काही गंभीर आजार असल्याचे सांगितले जात आहे. त्यांना दाखल होताच पुढील उपचारासाठी रेफर करण्याचा सल्ला दिला होता, मात्र त्यांनी जाण्यास नकार दिला होता. दरम्यान, मृत्यूनंतर नातेवाईकांनी कोणताही आरोप केलेला नाही.सलग घडणाऱ्या या मातेच्या पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३४.५० क्विंटल | २,००० | ३,०७० | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड: ३७९.०० क्विंटल | १,७५१ | ३,२०१ | २,४०६ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ११.५० क्विंटल | ६,५५० | ७,१५० | ६,९५५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १२९.५० क्विंटल | २,०७० | २,७५१ | २,४८० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७१.५० क्विंटल | ४,४२५ | ४,५११ | ४,४७१ |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ५,५०० | ५,५९० | ५,५४७ |

### राज्यात पुढच्या दोन दिवसांत अवकाळी पाऊस

अनेक ठिकाणी गारपिटीचा तडाखा हवामान विभागाचा इशारा!



पुणे । प्रतिनिधी

मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात कमाल तापमानाचा पारा १ ते २ अंश सेल्सिअसने उतरला आहे. मात्र, विदर्भात उष्णतेची लाट कायम आहे. पुढील एक ते दोन दिवसांत पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान, अकोला येथे ४२.४ सर्वाधिक तापमान नोंदविले गेले. तर, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात रविवारी गारासह अवकाळी पाऊस झाला.


पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरामध्ये सक्रिय असणारा कमी दाबाचा पट्टा निवळला आहे. पान २ वर

# आवादा कंपनीत दरोडा टाकणारी टोळी गजाआड

## साडेअकरा लाखाचा माल हस्तागत

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा शिवारात आवादा कंपनीने अधिगृहण केलेले पॉईटवर पवणचक्कीचे इस्टोलेशनचे काम सुरू आहे. या ठिकाणी कंपनीचे दोन सेक्युरीटी कार्ड यांना चौदा अज्ञात आरोपीतांनी हातपाय बांधून त्यांना मारहाण केली होती. तसेच पवणचक्कीचे कॉपर केबल कटरच्या सहायाने कापुण एकुण १२ लाख ८७ हजार ८०० चे कॉपर केबल चोरी केले केल्याची घटना घडली होती. त्यानुसार गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या टोळीला गजाआड केले आहे. तसेच एकुण ११ लाख ५८ हजार ५०० रु चा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेली बुलेरो वाहन जप्त करण्यात आलेले आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिली.



बीड येथील पोलिस अधिक्षक कार्यालय येथे सोमवारी (दि. १४) जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पत्रकार परिषद घेऊन टोळी गजाआड पान २ वर

## भीम सागराने वाहिली महामानवास पुष्पफुले

# जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात







### जयंतीच्या मिरवणूकीने वेधले शहराचे लक्ष

बीड । प्रतिनिधी

**विश्वरत्न, महामानव, बोधिसत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) रोजी सकाळी १० वाजता बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भिम सागर उसळला होता.आंबेडकरी जनतेने पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन महामानवाला अभिवादन केले.दरम्यान बीड जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.**

विश्वातील अनेक देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जाते. त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी महामानवास अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनतेने अलोट गर्दी केली होती. यावेळी भिख्खु धम्मशिल थेरो, महालिंग निकाळजे, बौद्धचार्य सदाशिव कांबळे, गौतम खेमाडे यांनी उपस्थित आंबेडकरी जनसमुदायाला त्रीशरण, पंचशिल, भिमस्तुती, शरणतय ग्रहण करुन देत उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित केले.दरम्यान जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक, नवनीत कावत, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,एसडीएम कविता जाधव, सीओ नीता अंधारे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे या सर्वांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मनोज जरांगे पाटील,आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.जनार्धन तुपे, सुशीलाताई मोराळे, प्रा.प्रदिप रोडे, अजय सवाई, सचिन मुळुक,अशोक हिंगे,अशोक लोढा, चंद्रकांत नवले, गौतम चोपडे, राजू जोगदंड,ॲड. भगवान पान २ वर

cmyk

अग्रलेख

# राणा भारताच्या ताब्यात

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणण्यात यश आले आहे. अमेरिकेकडून त्याच्या प्रत्यार्पणाला हिरवा कंदिल मिळाल्यानंतर भारतीय पथकाने त्याला अमेरिकन 'गल्फस्ट्रीम जी-५५०' या विमानाने दिल्लीच्या पालम विमानतळावर आणले. त्यानंतर मूळचा पाकिस्तानी आणि नंतर कॅनडाचा नागरिक असलेल्या तहव्वूर राणा याला थेट राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मुख्यालयात नेण्यात आले. यावेळी मुख्यालयाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाचे भारताकडे प्रत्यार्पण केल्यानंतर पाकिस्तानने आपले हात झटकले आहेत. राणाने गत दोन दशकांत त्याच्या पाकिस्तानी कागदपत्रांचे नूतनीकरण केलेले नाही. त्यामुळे तो कॅनेडियन नागरिक असल्याचे अगदी स्पष्ट आहे, असे पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने म्हटले आहे.

आता पाकिस्तानने हात झटकले असले तरी 'सुंभ जळाला तरी पीळ कायम असतो' हे त्यांच्या लक्षात यायला हवे. लक्षात आले असले तरी कांगावा करण्याचे प्रयत्न होतच असतात! दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी तहव्वूर राणा याचे अमेरिकेहून भारतात पदार्पण होणे हे भारतासाठी मोठे यश आहे, अशी प्रतिक्रिया दहशतवादी हल्ल्यातून बचावलेल्या साक्षीदार देविका रोटावन यांनी दिली आहे. पाकिस्तानात लपून बसलेल्या इतर कटकारस्थान्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली. २६/११ प्रकरणातील महत्त्वाच्या साक्षीदार असलेल्या रोटावन यांनी न्यायालयात दहशतवादी कसाबची ओळख पटवून दिली होती. राणा याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

अवघ्या ९ वर्षांच्या असताना देविका रोटावन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे झालेल्या गोळीबारात जखमी झाल्या होत्या. त्यांच्या पायाला गोळी लागली होती. वडील आणि भावासोबत पुण्याला जाण्यासाठी रोटावन प्लॅटफॉर्मवर रेल्वेची वाट पाहत असताना स्टेशनवर दहशतवादी हल्ला झाला होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी १० शस्त्रसज्ज पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबईवर भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यात ३४ परदेशी नागरिकांसह किमान १९७ निष्पाप लोकांचे बळी गेले होते तर ८०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते. मुंबई पोलिस व भारतीय सुरक्षा दलांनी ९ दहशतवाद्यांना ठार केले होते तर अजमल कसाब या एकमेव दहशतवाद्याला जिवंत पकडले होते. राणाचे प्रत्यार्पण हे हल्ल्यातील पीडित कुटुंबे आणि मुंबईसाठी न्याय व समाधान मिळवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. १६ वर्षांच्या लढ्यानंतर राणाचे प्रत्यार्पण झाले आहे. आता डेव्हिड हेडली आणि हाफीज सईद यांनाही भारतात आणून त्यांना शिक्षा दिली पाहिजे.

२००८ च्या मुंबई हल्ल्यातील सहभाग प्रकरणी राणा अमेरिकेत शिक्षा भोगत होता. मे २०२३ मध्ये राणाच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेतील कोर्टाने मंजुरी दिली होती. त्या निर्णयाला राणाने अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टात याचिकेद्वारे आव्हान दिले होते. ही याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली होती. राणा हा त्याचा मित्र डेव्हिड हेडली याच्यासह डेन्मार्कमध्ये मुंबईवर हल्ला घडवून आणण्याच्या योजना आखल्याच्या आरोपाखाली २०१३ मध्ये दोषी आढळला होता. अमेरिकन कोर्टाने त्याला १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. गत ४० वर्षांत भारतात अनेक दहशतवादी हल्ले झाले आणि त्या सर्वांचे कोणी ना कोणी मास्टरमाईंड असल्याचे सुरक्षा यंत्रणांच्या लक्षात आले. हे मास्टरमाईंड त्याच्या मास्टर प्लॅनप्रमाणे हल्ले घडवत आले परंतु त्यातल्या फारच थोड्यांना शिक्षा होऊ शकली. कारण या दहशतवादी मास्टरमाईंडना पकडण्याकरिता आवश्यक ते उपाय करता आले नाहीत. आता देखील राणाला भारतात आणल्याचा गाजावाजा होतो आहे. परंतु त्याला पकडण्याकरिता १५ वर्षांचा कालावधी लागला. भारतात हल्ले घडवायचे आणि परदेशात पळून जायचे हे प्रकार पूर्वीपासून होत आले आहेत.

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यांचा इतिहास पाहता सर्वप्रथम नाव येते ते दाऊद इब्राहिमचे. त्याने १२ मार्च १९९२ ला मुंबईत १२ बॉम्बस्फोट घडवले. हा भारतातला सर्वांत मोठा दहशतवादी कट होता. राणाविरुद्धचा खटला जलदगती कोर्टामध्ये चालवून त्याला लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे. नसता त्याला सांभाळण्यात विनाकारण मोठा खर्च करावा लागेल. हत्ती पोसण्यासारखा हा प्रकार होईल. दहशतवादाच्या आगीत भारत हा सर्वाधिक पोळलेला देश आहे. स्थानिक पातळीवर भारताने हा दहशतवाद संपुष्टात आणण्याच्या दिशेने कठोर पावले उचलली नाहीत म्हणूनच इतक्या मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. खरे तर संपूर्ण जगाने दहशतवादाविरुद्ध एकत्र यावे असे आवाहन भारताने वारंवार केले होते. पण अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाच जगाला दहशतवादी हल्ल्यातील दाहकता लक्षात आली. तरीसुद्धा दहशतवादाचा झटका बसलेल्या अमेरिकेने राणासारख्या दहशतवाद्याचे प्रत्यार्पण करण्यासाठी विलंब लावला. कदाचित अमेरिकेला भारतातला दहशतवादी हल्ला फारसा महत्त्वाचा वाटला नसावा. भारताने यापासून योग्य धडा घेतला पाहिजे. २६/११च्या हल्ल्यामागे दाऊदचा अदृश्य हात होता. म्हणून त्यालाही भारतात आणून शिक्षा केली पाहिजे.

ते शक्य होत नसेल तर अमेरिकेने जसे लादेनला संपवले तसे दाऊदलाही संपवले पाहिजे. गत काही वर्षांत भारतातले हल्ले थांबलेले दिसत असले तरी अशा हल्ल्यांना सहानुभूती असणारी मानसिकता अजूनही कार्यरत आहे. छोटे-मोठे दंगे घडवण्यामागे तीच मानसिकता आहे. राणासारखा मास्टरमाईंड जरी हाताशी लागला तरी स्थानिक पातळीवर मदतीचा हात देणारे छुपे माईंड भरपूर आहेत. त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. काश्मीरमध्ये पोसला गेलेला दहशतवाद राजकारण्यांच्या छत्रछायेखाली पोसला गेलेला दहशतवाद होता. राणासारखा दहशतवादी पकडला जाऊ शकत असेल तर पाकिस्तानात बसून भारतातल्या घडामोडींचे सूत्रसंचालन करणा-या आणि अनेक वर्षे भारताला चकवा देणा-या मास्टरमाईंड दाऊद इब्राहिमचा हिशेब करण्याची वेळ आली आहे. समन्वय, सातत्याने प्रयत्न आणि सकारात्मक पाठपुरावा केला तर असाध्य ते साध्य होऊ शकते.

# आ.धनंजय मुंडे यांनी केली वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांची पाहणी

## मंदिर व परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्त्व जपून दर्जेदार पद्धतीने वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना

परळी वै. । प्रतिनिधी

**बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून मंजूर असलेल्या २८६ कोटी रुपयांतून सुरू असलेल्या विविध कामांची माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांच्या तसेच कंत्राटदारांच्या समवेत पाहणी केली.**

मंदिर परिसरात भव्यदर्शन मंडपाचे काम सुरू असून आता चौथ्या मजल्याचेही काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी ग्लास री-इन-फोर्सड कॉंक्रीट पद्धतीने काम पूर्ण करावे, दगडी पायऱ्यांचे काम तसेच परिसरातील अन्य वस्तूंच्या कामाच्या संदर्भात पुरातन महत्व जपून तसेच दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण केले जावे अशा सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांना केल्या आहेत.



वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी २८६.६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून यातून आतापर्यंत एका भव्य अशा भक्त निवासाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. प्रदक्षिणामार्गाचे काम देखील अंतिम टप्प्यात असून, भव्य असे प्रवेशद्वार दगडी पायऱ्या दर्शन मंडप अशी कामे सध्या सुरू आहेत. मंदिर परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्व जपण्याबरोबरच दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत काम पूर्ण करावेत अशा सूचना धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधितांना केल्या. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, राजा खान, जाफर खान, आर्किटेक्ट श्री बांगड, शिल्पकार गनीभाई यांसह अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते.

# पैसे व मोबाईल चोरीच्या कारणावरून जालन्यात खुन

## • आरोपी ४ तासात पकडला

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील विशाल कॉर्नर भागात ३५०० रूपये व मोबाईल चोरल्याच्या कारणावरून गजानन दगडुबा कायंदे रा. रूमणा ता.सिंदखेड राजा जि. बुलढाणा याची तीन जणांनी मिळून लाकुड दांडयाने मारहाण करून खून केली होती. त्या हत्येच्या गुन्हयात चंदनझिरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ कार्यवाही करत चार तासाच्या आत खुनातील आरोपी भारत पारसनाथ बंकट रा. भवाणी नगर जुना जालना यास ताब्यात घेवुन इतर आरोपीतांचा शोध घेत आहेत.

सदर कामगीरी पोलीस अधीक्षक श्री, अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली, प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे चंदनझिरा सम्राटसिंग राजपुत, यांच्या टीमने कारवाई केली.

# साई पब्लिक स्कूल ही ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये शिकवणारी शाळा-डॉ.आनंदगावकर

दिंद्रुड । पतिनिधी

**साई पब्लिक स्कूल ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये शिकवणारी शाळा आहे. इथे प्रभावी अध्यापन पद्धती, योग्य अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करणारी व्यवस्था असल्यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि मानसिक विकास होतो. अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना पैलू पाडण्याचे काम या शाळेत होत असल्याचे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाश आनंदगावकर यांनी केले. शाळेत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.**

माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे भूमीदर्शन सामाजिक प्रतिष्ठानचे साई पब्लिक स्कूल आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शाळेत दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव मुंडे होते. तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ भाजपा नेते डॉ प्रकाश आनंदगावकर, सिद्धेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश गटकळ होते. देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, पत्रकार संतोष स्वामी, नागेश वखरे, पात्रुडचे माजी सरपंच एकनाथ मस्के, सौ. उषा सुनीलराव मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. लोकगीते, गवळण, लावणी, भारूड, क्लासिकल नृत्य, भांगडा, कोळीगीत, पोवाडा आदी लोकगीते सादर करण्यात आली. आजकाल मुली कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मुली सर्वच पातळीवर आघाडीवर असल्याचे दर्शविणारे ' बेटी हमारी अनमोल' हे गीत प्रेक्षकांना खुपच भावले. विनोदी गीत, लघुनाटिका व देशभक्तीवर आधारित गीते मुलामुलींनी सादर केली. दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन पहायला मिळाले. यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच उत्तम अध्यापन व व्यवस्थापन करणाऱ्या शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तु देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन वर्षा सोळंके, दीक्षा कांबळे, प्रतिभा टाकणखार, प्रियांका रोटे, संस्कृती शिंदे व शीतल चव्हाण यांनी केले. तर आभार सारिका टाक व आकाश चव्हाण यांनी मानले. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कार्यवाह लक्ष्मीकांत सोळंके, संचालक सुनीलकाका मुंडे, गणेश सोळंके, प्राचार्य शरद चव्हाण, पर्यवेक्षक सौ. वर्षा सोळंके आदींसह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# पान १ वरून...

### देशात ट्रॅक्टर

तसेच देशात आगामी मॉन्सून हंगामात सरासरी १०३ टक्के पावसाचे संकेत स्कायमेट या खाजगी हवामान संस्थेने दिले आहेत. त्याचाही ट्रॅक्टरच्या विक्रीला आधार मिळू शकतो. त्यामुळे पुढील काळात ट्रॅक्टरची मागणी कायम राहील, असा विश्वास उद्योगाकडून व्यक्त केला जात आहे. ट्रॅक्टरची निर्यात मागील वर्षीच्या तुलनेत काहीशी सुधारली आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ९७ हजार ८२८ ट्रॅक्टर युनिट्सची निर्यात झाली होती. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये मात्र ट्रॅक्टर निर्यात ९८ हजार ८१३ युनिट्सच्या घरात पोहचली आहे. तर एकूण ट्रॅक्टर उत्पादन मागील वर्षीच्या ९ लाख ४७ हजार १४३ युनिट्सवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १० लाख ७ हजार ६६० वर पोहचलं आहे. परंतु २०२३ च्या तुलनेत मात्र उत्पादनात घट झालेली आहे. दरम्यान, राज्यात खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या प्रमुख शेतीमालाला हमीभावापेक्षा कमी दर मिळाला. त्यामुळे मॉन्सून हंगामात पावसाने साथ देऊनही कमी उत्पन्नामुळे खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे हप्ते थकले, असल्याचं राज्यातील शेतकरी सांगतात.

-------------

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे

आंबेडकरांच्या विचारातूनच झाली असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि बाबासाहेब यांचे अतूट नाते असल्याचे प्रतिपादित केले.भारताच्या संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवण्याचे अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आज आपण जो एकसंघ भारताचा अनुभव घेत आहोत, त्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान हेच आधारस्तंभ आहे. संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहेत. देशातील सामाजिक विषमतेला आव्हान देत समता आणि बंधुत्वाचे मूल्य देशात रुजवण्याचे ऐतिहासिक कार्य बाबासाहेबांनी केले. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला जगण्याचा समान अधिकार, संधीची समानता आणि आपली स्वप्ने साकार करण्याचा विश्वास दिला, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे आजचा आधुनिक भारत घडला असून, त्यांच्या विचारांचे पालन करून संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा ठेवणे हीच त्यांच्या जयंतीला खरी आदरांजली ठरेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, भारताचे संविधान हे माझ्यासाठी सर्वोच्च आहे. भारताच्या विकासात आणि प्रगतीच्या दिशेने देशाला पुढे नेण्यात संविधानाची भूमिका मोलाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीत शिक्षण, सामाजिक न्याय, औद्योगिक विकास आणि मानवी हक्कांचे जसे मोलाचे योगदान आहे, तसेच आधुनिक भारताच्या संरचनेतही त्यांचे कार्य अतुलनीय आहे. पाटबंधारे योजना, राष्ट्रीय विद्युत ग्रीड, कामगार हक्कांचे संरक्षण, तसेच अन्य महत्त्वाच्या धोरणांचे शिल्पकार म्हणून त्यांनी देशाला दीर्घकालीन दिशा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यास व विचारांना अभिवादन करणे आणि संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा राखत समता, बंधुता व न्याय यांचा अंगीकार करणे, हीच त्यांना खऱ्या अर्थाने मानवंदना ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी केले. बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभागामार्फत आयोजित बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी यावेळी भेट दिली. मा. राज्यपाल यांच्या हस्ते सर्व भिक्षूना चिवरदान करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते यावेळी अंध विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत त्रिशरण बुद्धवंदना म्हणण्यात आली. तसेच मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी संबोधित केले. कार्यक्रमास व्यासपीठावर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार कॅप्टन तमिल सेलवन आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईतील त्यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. संविधानाच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या संविधानानेच देशाच्या महासत्तेचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेबांचा पुतळा हा संविधानशिवाय अपूर्ण असतो. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित, पीडित लोकांना न्याय देण्याचे काम केले. संविधानाने सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. संविधान निर्माण करताना त्यांची दूरदृष्टी आणि बुद्धीची प्रगल्भता लक्षात येते. डॉ. बाबासाहेबांचा मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर पहिला सत्कार मुंबईत झाला. एवढेच नव्हे तर, केंद्रीय मंत्री, प्रांतिक अध्यक्ष, गोलमेज परिषदेवरून देशात परत आल्यावर, राज्यघटना पूर्ण करून परत आल्यानंतर अशा अविस्मरणीय क्षणी बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्कार मुंबईमध्येच झाला. बाबासाहेब यांनी वयाची ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल चैत्यभूमीवर अभिवादन सभाही मुंबईतच पार पडल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. बाबासाहेबांच्या संपूर्ण जीवनपटात त्यांना उजाळा देणारे, त्यांच्या स्मृती जागविणारे अनेक प्रसंग मुंबईने अनुभवले आहेत. त्यांच्या पुस्तकांचे प्रकाशन आणि प्रिंटिंगही मुंबईतच झाले. त्यांच्या राजकीय आयुष्याचे अनुष्ठान हे मुंबईतूनच सुरू झाले. शोषितांचा आवाज बनवून ते आयुष्यभर लढले, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्रास्ताविक आमदार कोळंबकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तसेच रुग्णवाहिकेचे लोकार्पणही करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---------

### चोरीच्या प्रकरणात आरोपीऐवजी

'आरोपी नगमा खान तिच्या घरी आढळली नाही, कृपया पुढील कारवाई करा, असे लिहीले होते. न्यायालयाने या निष्काळजीपणाला गांभीर्याने घेतले. अहवालात आरोपीच्या जागी न्यायाधीशाचे नाव पाहिल्यानंतर न्यायाधीश नगमा खान यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) नगमा खान पोलिसांवर चांगल्याच संतापल्या. पोलिसांच्या या निष्काळजीपणाबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.ज्या अधिका-याला कारवाई करायची होती त्याला ना प्रक्रिया समजते आणि ना आदेश कोणाविरुद्ध आहे हे माहित आहे. हा कर्तव्यातील स्पष्ट निष्काळजीपणा आहे असे नगमा खान यांनी म्हटले. नगमा खान यांनी पोलिसांच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित करत आग्रा रेंजच्या पोलिस महानिरीक्षकांना पत्र लिहून या प्रकरणाची माहिती दिली. आता या प्रकरणाची सुनावणी २६ एप्रिल रोजी होणार आहे.

---------------

### आवादा कंपनीत दरोडा

केल्याची माहिती दिली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख उपस्थित होते. जिल्हा पोलिस अधिक्षक काँवत म्हणाले, फिर्यादी नामे आकाश भास्कर जाधव व्य. वॉचमन आवादा कंपनी यांनी दिलेल्या फिर्याद वरुन दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी पो.स्टे. केज येथे गु.र.नं.१४५/२०२५ कलम ३१० (०२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हयाची नोंद झाली होती. सदर गुन्हयाचे अनुषंगाने आरोपीचा शोध घेवुन अटक करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांना सूचना दिल्या होते. त्यानुसार त्यांच्या पथकातील सपोनि जोनवाल, पोउपनि विघ्ने व पथकातील अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपी शोध घेण्यासाठी सुचना दिल्या त्यावरुन स्था.गु.शा. पथकाने दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी गजाआड केले आहेत. यात बबन सरदार शिंदे रा. नांदुर ता. केज, धनाजी रावजी काळे रा. लक्ष्मी पारधीवस्ती जि.धाराशिव,मोहन हरि काळे रा. रा. लक्ष्मी पारधीवस्ती जि.धाराशिव, लालासाहेब सखाराम पवार रा. दसमेगाव ता. वाशी, जि.धाराशिव यांचा समावेश आहे. तसेच एकुण ११ लाख ५८ हजार ५०० रु चा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेली बुलेरो वाहन जप्त करण्यात आले आहे.

**आरोपींवार २७ गुन्हे दाखल**

पवनचवकी कॉपर वायर दरोडा,ट्रॉन्सफर कॉपर वायर चोरी, कॉपर वायर चोरी, पवनचक्की कॉपर वायर चोरी सदर आरोपी हे अभिलेखावरील मालाविरुध्दचे व शरिराविरुध्दचे एकुण २७ गुन्हे दाखल असून ते एकत्र येवुन संघटीत होवुन गुन्हे करण्याचे सवयीचे असल्याने त्यांचेवर मकोका कायदा अन्वये कारवाई करण्यात येणार आहे.

**कारवाईत यांचा होता समावेश**

या कारवाईमध्ये सपोनि विजयसिंह जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, ग्रे. पोउपनि हनुमान खेडकर, पोह/महेश जोगदंड, भागवत शेलार, तुषार गायकवाड, गणेश मराडे, पोशि/बाप्पासाहेब घोडके यांचा समावेश होता.

-----------

### राज्यात पुढच्या दोन

मात्र, राजस्थानच्या पश्चिमेपासून विदर्भाच्या उत्तरेपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाच्या प्रक्रियेलाही वेग आला. त्यामुळे काही भागांत पावसाचा अंदाज आहे. जळगाव, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक आदी भागांतील कमाल तापमानाचा पारा काहीसा उतरला. सोलापूर अद्यापही ४० अंशाच्या पुढेच आहे. पुढील दोन दिवस नंदुरबार, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या भागांत पावसाचा अंदाज आहे. जळगाव जिल्ह्यात रावेरनंतर चोपडा तालुक्यात रविवारी दुपारी दोन वाजता ढगांच्या गडगडाटासह पाऊस झाला, तर काही ठिकाणी गाराही पडल्या. गहू, केळी, हरभरा पिकांचे नुकसान झाले आहे.

**सलग दुसऱ्या दिवशी गारपीट**

नाशिक जिल्ह्यातील तीन तालुक्यांमध्ये सलग दुस-या दिवशीही गारपीट झाल्याने उन्हाळ कांद्यासह द्राक्ष आणि गहू पिकांचे नुकसान झाले आहे. रविवारी येवला, निफाड आणि चांदवड तालुक्यांतील काही गावांना गारपिटीचा फटका बसला.

**उत्तर महाराष्ट्रात दाणादाण**

गेले दोन दिवस राज्यात झालेल्या हवामान बदलाचा फटका उत्तर महाराष्ट्राला बसला असून जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत काही ठिकाणी झालेल्या अवकाळी पावसाने पिकांची दाणादाण उडाली. अहिल्यानगरमधील अकोले तालुक्यात धामणगाव आवारी आणि परिसरात रविवारी दुपारी तासभर वादळासह अवकाळी पावसाने हजेरी लावली.

------------

### जिल्हा रुग्णालयाचा कारभार चव्हाट्यावर!

मृत्यूंच्या घटनांमुळे जिल्हा रुग्णालयातील सेवा व उपचार प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत असून, आरोग्य यंत्रणेने या घटनांची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

-------------

### भीम सागराने वाहिली महामानवास पुष्पफुले

कांडेकर,अविनाश जोगदंड, बबन वडमारे, अनिल डोंगरे, अरुणाताई आठवले, सुमेध जोगदंड, ॲड. राजेश शिंदे, प्रा.अशोक गायकवाड, इंजि स्वप्निल चोपडे, मनोज वाघमारे,गंगाधर काळकुटे, मनोज जाधव, म्हलारी जाधव, यांच्यासह भिम सागर उसळला होता.

**दोनशे वकिलांची अभिवादन रॅली**

बीड न्यायालय परिसर, वकील संघ उत्सव समितीकडून संविधान बंधुभाव मोटारसायकल रॅली काढण्यास आली.या अभिवादन रॅलीत देनशे वकील सहभागी झाले होते. वकील संघाचे अध्यक्ष ॲड.रोहिदास येवले, उत्सव समिती अध्यक्ष ॲड. विनायक जाधव, लॉयर फोरम अध्यक्ष ॲड.राहुल साळवे, ॲड. रईस पठाण, ॲड.मधुसूदन बाहेगव्हाणकर, ॲड.समीर पाटोदकर, ॲड. विलास जोशी उपस्थित होते. संचलन ॲड.सुरेश वडमारे यांनी केले.

**समताज्योत रॅली कौतुकास्पद**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने बीड छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सोमवारी रात्री १२ वाजता समताज्योत रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतील समताज्योत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हातात देवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

**असा होता पोलीस बंदोबस्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्या अनुषंगाने तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त होता.

**या ठिकाणाहून निघाली अभिवादन रॅली, मिरवणूक**

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी ९ वाजता अभिवादन रॅली काढण्यात आली होती. ही अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्यासह शहरातील बौद्ध विहार कमिट्यांकडून काढण्यात आली होती. तर सायंकाळी ६ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. शहरातील जवळपास १०० उत्सव समित्या मिरवणूक सहभागी झालेल्या होत्या.

**सार्वजनिक जयंतीचा आदर्श**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून ४ ते १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडले. १३ तारखेला सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला प्रचंड गर्दी लोटली होती.

--------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५






## एस.एम.देशमुखांची मध्यप्रदेशात एंट्री

**मुंबई :** मध्यप्रदेश स्टेट प्रेस क्लबचे राष्ट्रीय अधिवेशन सध्या इंदोर येथे सुरू आहे.. या पत्रकारिता महोत्सवात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री. एस.एम.देशमुख यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यात मराठी पत्रकार परिषदेचे जाळं निर्माण करणारे तमाम पत्रकार बांधवांच्या सुखदुःखात सदैव तत्पर राहुन आपल्या हक्काचा माणूस म्हणून एस.एम.देशमुख सर यांच्या कडे तळागाळातील पत्रकार पाहतो आहे. निश्चितच महाराष्ट्र राज्यातील तमाम पत्रकारांना अभिमान वाटतो. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची मध्यप्रदेश प्रेस मध्ये एंट्री झाली असून मध्यप्रदेश स्टेट प्रेस कडून सरांचं यथोचित स्वागत करण्यात आले.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

**१५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता 'संवाद मराठवाडयाशी उपक्रम;आठही जिल्हयातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन, नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद**

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक आपल्या वार्डातील अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी विभागीय आयुक्त संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाडयाशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विभागीय



आयुक्त श्री गावडे नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारी उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरपरिषद सह आयुक्त देविदास टेकाळे, नगर प्रशासन विभागाच्या ॲलिस पोरे, संजय केदार उपस्थित असणार आहेत. प्रत्येक आठवडयात संवाद साधला जाणार आहे. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी नगर विभाग विभागाच्या सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत. नागरिकांनी नगर विकास विभागाशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.




**बीड : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने खिचडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता नागरिकांतून प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यावेळी वंचित बहुजन आघाडीची पूर्ण टीम कार्यरत होती.**




**बीड : जिल्हा परिषद शिक्षण विभाग येथें महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळीअधिक्षकरंगनाथ राऊत,शालेय पोषण अधीक्षक तुकाराम पवार,उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे,मिलिंद तुरूकमारे,सहायक प्रशासन अधिकार अनंत खेडकर, खांडे व कुर्लेकर**

# वडवणीच्या भीम जन्मोत्सवाच्या भोजनदान कार्यक्रमातून दहा हजार लोकांनी घेतला अस्वाद

### जयसिंग सोळंके यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण तर मनोज जरांगे पाटील व धनंजय देशमुख यांची भेट

वडवणी । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वडवणी येथील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने काल दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांच्या माध्यमातून तब्बल दहा हजार लोकांनी जेवणाचा महाअस्वाद घेतला आहे. तर या उपक्रमाचे सर्वच सामाजिक स्तरातून विशेष कौतुक केले जात आहे.तर शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुख्य चौकाचे ध्वजारोहण व प्रथमेचे पूजन युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. तर या भीम महोत्सवाला मराठा युद्धे मनोज जरांगे पाटील व मस्साजोगचे धनंजय देशमुख यांनी भेट देत अभिवादन केले आहे.

काल सकाळी ९ वा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौका पासून ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य-दिव्य अशी मोटार सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी महापुरुषांच्या जयघोषाने वडवणीकरांचे लक्ष वेधून घेतले. तर ठीक सकाळी १० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुख्य चौकात कार्यक्रम संपन्न झाला. याठिकाणी निळा



ध्वजाचे ध्वजारोहण व प्रथमेचे पूजन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते पार पाडले. या कार्यक्रमाला वडवणीचे तहसीलदार संजय जिरांगे, वडवणी पोलीस स्टेशनचे प्रमुख एपीआय अमन सिरसट, नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्यासह सर्वच नगरसेवक, विविध पक्षाचे नेते- पदाधिकारी, व्यापारी वर्ग, यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते सह समाज बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यानंतर काल सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. आंबेडकर चौक या ठिकाणीच स्नेह सुरची महाभोजनाचा कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. अतिशय उत्कृष्ट असे सुरची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. उत्सव समितीच्या वतीने अतिशय चोखपणे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वडवणी शहरासह संपूर्ण तालुक्यातील तब्बल सर्वच घटकातील दहा हजार लोकांनी या जेवणाचा महा अस्वाद घेतला आहे. तर पहिल्यांदाच असे मोठे नियोजन करण्यात आले असल्याचे दिसून आले आहे. तर या भोजनाच्या कार्यक्रमाचे सर्वच समाज बांधवांच्या माध्यमातून उत्सव समितीचे विशेष कौतुक करण्यात आले आहे. तर आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मराठा युध्दे मनोज जरांगे पाटील यांनी भीम जन्मोत्सव कार्यक्रमाला भेट दिली.जरांगे पाटील यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकाला प्रथम अभिवादन केले. यानंतर समाज बांधवांना जयंतीच्या शुभेच्छा देत म्हणाले की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हा-आम्हाला विचार दिला आहे. त्या विचाराचे पाईक होत सर्व समाज बांधवांनी गुण्यागोविंदाने राहावे तसेच सामाजिक परिवर्तन देखील करावे. प्रत्येक समाजातील तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे. तेव्हाच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सार्थकी लागली असे म्हणता येईल असे विचार जरांगे पाटील यांनी यावेळी मांडले मांडले. यावेळी मनोज जरांगे पाटील येणार आहेत. म्हणून वडवणीच्या मुख्य रस्त्यावर हजारोंच्या संख्येने सर्व समाज बांधव उपस्थित होते. तर त्यांच्या समावेत मसाजोग येथील धनंजय देशमुख यांचे देखील उपस्थिती होती. यानंतर आझाद क्रांती सेनेचे संस्थापक के अध्यक्ष राजेश घोडे यांनी देखील भीम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाला भेट दिली आहे. यावेळी सर्व मान्यवरांचे आभार जयंती उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष राहुल घाडगे यांनी मानले आहेत.तर हा कार्यक्रम जेष्ठ मार्गदर्शकाच्या नियोजनाखाली घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांच्यासह समाजातील तरुणांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# विहीर मंजूर करण्यासाठी ६० हजार लागतात,ग्रामसेवकाचा लाभार्थ्याला सल्ला?

**जालना । प्रतिनिधी**

एमआरजीएस मधून विहिर मंजूर करण्यासाठी ६० हजार रुपये लागतात असा सल्ला अंबड तालुक्यातील पानेगांवचे ग्रामसेवक मिसाळ यांनी लाभार्थ्याला सल्ला दिला. तसेच पैसे दिल्याशिवा विहीर मंजूर होतच नाही असा सल्ला लाभार्थी महादेव बडे यांना दिल्यामुळे अशी तक्रार पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे कारवाई करण्यासाठी तक्रार अर्ज करण्यात आली तसेच इतर अधिकारी यांच्याकडे सुद्धा तक्रार करण्यात आली परंतु या तक्रारीचे कोणतेही अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. यासंदर्भात जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जगदीश मनियार यांना विचारले असता ते म्हणाले की संबंधित तक्रारदाराची चौकशी अंबड गट विकास अधिकारी हे करतील व त्याचा अहवाल माझ्याकडे आल्यानंतर मी चौकशी करून कारवाई करणार असे ते म्हणाले.

राज्य व केंद्राकडून मागील त्याला विहीर मिळणार आहे असा अर्ज अर्ज लाभार्थी यांनी एमआरजीएस मधून ऑनलाईन अर्ज केला होता, विहिर योजना मध्ये विहिर मागणी रोजगार सेवक दिपक सानप यांच्याकडे ऑनलाइन करण्यात आले होते. नंतर ग्राम सेवक म्हणाला की, फक्त विहिर मंजूर करण्याकरता ६००००/- रुपये लागतात आणि शेतात पहिली विहिर असून दुसऱ्या विहिरीचा लाभ घेण्यासाठी ८००००/- रुपये लागतात विहिर पोक्लंड व जेसीबी ने खानदायची असल्यास व रोजगार न लावता १०००००/- रुपये जुन्या विहिरीचे पैसे काढवयाचे असल्यास १२०००० रुपये ग्रामसेवक मिसाळ यांनी असे म्हटले की, पहले २७००००/- भेटत होते आता ४०००००/- रुपये भेटतात त्यामुळे तुम्हास १२००००/-रुपये देण्यास काहीही अडचण नाही आम्ही त्यांना सांगितले की एवढे पैसे कशासाठी लागतात मिसाळ मला आले की यामध्ये माझ्या एकटयाचा वाटा नसून जमदाडे व पंचायत समिती मधील काही अधिकारी जिल्हा परिषद मधील यांना सुध्दा यामधील हिस्सा दयावा लागतो असे ग्रामसेवक यांनी सांगितले या योजने अंतर्गत संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी करण्यात यावी. अशी मागणी लाभार्थी अर्जदार महादेव बडे यांनी केली आहे. यासंदर्भात ग्रामसेवक यांना विचारले असता ते म्हणाले की काय तक्रार केली माझ्यापर्यंत किंवा अर्ज आला नाही व तसेच ती तक्रार खोटी असू शकते असे ते म्हणाले सदरील तक्रार विस्तार अधिकारी यांनी सदरील तक्रार अर्ज ग्रामसेवकाला दिला नसेल असे म्हणाला हरकत नाही. तिची पण चौकशी करणे होणे गरजेचे आहे.

# सातत्यपूर्ण पुस्तक वाचनाच्या छंदातूनच भविष्य घडवता येते -धर्मराज करपे

पिंपळवंडी । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य घडवायचे असेल तर सातत्यपूर्ण अवांतर वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे.अशा वाचनातून आपण आपले उज्वल भविष्य घडवू शकतो व देश विकासात आपले योगदान देऊ शकतो असे मत सुप्रसिद्ध व्याख्याते धर्मराज करपे सर यांनी व्यक्त केले.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यातील पी.एम.श्री.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी तालुका पाटोदा येथे ते विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या



जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या पैलूंचे त्यांनी अत्यंत सुंदर शब्दात वर्णन करून विद्यार्थ्यांची मने जिंकली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण देशासाठी विविध क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांनी दिलेला देशसेवेचा वसा आपण अखंडीतपणे व निस्वार्थीपणे पुढे चालू ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे त्यांनी आपल्या एक तासाच्या व्याख्यानातून व्यक्त केले.भारतीय संविधानाची निर्मिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मिती बद्दलच्या कार्याचा त्यांनी सविस्तर आढावा विद्यार्थ्यांना विशद करून सांगितला.याप्रसंगी शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी पिंपळवंडी येथील नागरिक पोस्टमन राजू मोरे, तसेच माजी केंद्रप्रमुख चांगदेव बेद्रे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंगद जरे,शाळेचे मुख्याध्यापक आजिनाथ सुळे सर आणि जरेवाडी शाळेतील शिक्षक बांधव,प्रशालेतील सर्व विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा कार्यालयात साजरी

**जालना । प्रतिनिधी**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक, क्रांतिकारी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालय, जालना व मस्तगड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून वंदन केले.**

यावेळी भाजपचे बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव,




प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, राजेश जोशी, देविदास देशमुख, शिवराज जाधव, जगदीश येनगुपटला, सोमेश काबलीये, संतोष खंडेलवाल, विकास कदम, सागर वाहूळकर, डोंगरसिंग साबळे, गौरव गोधेकर, आदींची उपस्थिती होती.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बक्षीस वितरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**लोकशाहीर आणणाभाऊ साठे अभ्यासिका, परळीवेस, अंबाजोगाई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाले.**

श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, साहित्य निकेतन ग्रंथालय व सेवाभारती, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अभ्यासिका,परळी वेस येथे १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विध्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ व थोर महामानव डॉ.आंबेडकर यांना अभिवादन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या



कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विजयराव वालवडकर (अध्यक्ष, स्थानिक व्य. मंडळ,खो. शै.संकुल अंबाजोगाई), प्रमुख उपस्थिती उन्मेष दादा मातेकर (अध्यक्ष, शालेय समिती,खो. प्रा. वि. अं. ), विशेष उपस्थिती दत्तप्रसादजी रांडद (अध्यक्ष, साहित्यकेतन ग्रंथालय, अं.) संजय जोगदंड( संपादक, लोकमान्य न्यूज ), कौस्तुभ दादा कोदरकर ( जिल्हा कार्यवाह, सेवा भारती ), नागनाथ आप्पा जोगदंड (माजी नगरसेवक ), सामाजिक कार्यकर्ते दिलीप लोंढे,मल्हारी जोगदंड, रवींद्र जोगदंड,लखन जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे सर, विभाग प्रमुख श्रीधर चौरे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचा उद्देश प्रास्ताविक रूपात कौस्तुभदादा कोदरकर यांनी स्पष्ट केला. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन रोहित कुलकर्णी यांनी केले. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविधस्पर्धेतील १६ गुणवंत्त विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अभ्यासकेतील ५५ विद्यार्थी, स्थानिकमहिला पुरुष उपस्थित होते. मनोज बरुरे व चव्हाण राजेश यांनी डॉ.आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित माहिती सांगितली.संजय जोगदंड यांनी अभ्यासिका नियमित सुरू असल्याने ती विद्यार्थ्यांना प्रेरक ठरत असल्याचे सांगितले.उन्मेष दादा मातेकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित स्वयंम रचित कविता म्हटली. विजयराव वालवडकर यांनी अध्यक्षीय समारोपात प्रतिकूल परिस्थितीत डॉ. आंबेडकर सिम्बॉल ऑफ नॉलेज कसे झाले हे सांगताना, ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ प्रमाणे निरंतर सुरू राहील असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभ्यासिका प्रमुख किशन गायकवाड यांनी केले, वैयक्तीकपद्द गायत्री संदिकर यांनी म्हटले.आभार श्रीधर चौरे यांनी मानले.

cmyk

# शेती प्रश्नी 'रयत क्रांती'चे धरणे आंदोलन

## रेल्वेला १ कोटी रुपये जमा करण्यास भाग पाडलं

नाशिक : गेल्या विधानसभा निवडणुकीत सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक घोषणा केल्या मात्र विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी माजी कृषी राज्यमंत्री आमदार सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली रयत क्रांती संघटनेच्या वतीने येवला प्रांत कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करत विविध मागण्या सरकारकडे करण्यात आले.

शेतकऱ्यांनी सकाळी ११ वाजता धरणे आंदोलनाला सुरुवात केली. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलक शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतजमिनीचे लिलाव त्वरित थांबवा अशा घोषणा यावेळी



दिल्या. विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीरनाम्यात शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू, अशी आश्वासन देण्यात आले. मतदारांनी भरभरून मतदानाचे दान दिले. मात्र सत्ता स्थापन झाल्यानंतर ही आश्वासन हवेत विरले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफी होणार नाही अशी घोषणा केली. त्यामुळे सदाभाऊ खोत सत्ताधाऱ्यांबरोबर घटक पक्ष म्हणून जरी असले शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर ठाम असल्याचे रयत क्रांती संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष वाल्मीक सांगळे यांनी बोलताना सांगितले.

या आहेत प्रमुख मागण्या

शेतकऱ्यांचे संपूर्ण पीककर्ज माफ करा. सोयाबीनला प्रति क्विंटल ६००० तर कांद्याला प्रति क्विंटल ४००० भाव द्या. नाशिक जिल्हा बँक शेतकऱ्यांचे जमीन लिलाव त्वरित थांबवण्यात यावे. वर्ष २०२४चे नुकसानभरपाई पीकविमा मिळावा. सर्व शेती मालाची निर्यात बंदी न करता शेतीमाल निर्यात करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.कर्जमाफी केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही

सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एकदिवसीय धरणे आंदोलन केले आहे. आगामी काळात संघटनेच्या माध्यमातून आंदोलनाची दिशा ठरवून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राज्यभर आक्रमक अशा आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात येईल, कर्जमाफी केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही असा इशारा यावेळी सांगळे यांनी दिला. यावेळी तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार पंकजा मगर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. संघटनेचे येवला तालुका प्रमुख नवनाथ वैद्य, निफाड तालुका प्रमुख संजय तासकर यासह ईश्वर सोनवणे, विलास भवर, कचरू सोनवणे, गोविंद करवर, दिनकर चव्हाण, तुकाराम गुळे, रवींद्र वानखेडे, भाऊसाहेब सोनवणे, नीलेश पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७३ : मराठा साम्राज्याचे सरनौबत प्रतापराव गुजर यांनी बहलोलखान पठाणाविरुद्ध मोठी लढाई जिंकली.
१८९२ : जनरल इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना झाली.
१८९५ : साली स्वातंत्र्यपूर्व भारतातील थोर समाजसुधारक व क्रांतिकारक लोकमान्य टिळक यांनी सर्वप्रथम कोकणातील रायगड किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती साजरी केली.
१९१२ : आर. एम. एस. टायटॅनिक हे जहाज उत्तर अटलांटिक महासागरात बुडाले.
१९२३ : मधुमेह असणा-यांना इन्सूलिन वापरण्यासाठी सामान्यतः उपलब्ध झाले.
१९४० : दुसरे महयुद्ध नाझी जर्मनीच्या ताब्यात असलेल्या नॉर्वेतील नॉर्विक शहरावर दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी हल्ला सुरू केला.
१९९४ : भारताने गॅट करारास मान्यता दिली.
१९९७ : मक्केपासून सहा किमी अंतरावरील मिना (सौदी अरेबिया) येथे हज यात्रेकरुंच्या तंबूला आग लागून किमान ३०० जण मृत्युमुखी पडले.
१९९८ : थम्पी गुरु म्हणून प्रसिद्ध असलेले फ्रेडरिक लेंज यांचे निधन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५२ : लियोनार्दो दा व्हिंची, इटालियन गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, चित्रकार.
१४६९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (मृत्यू: २२ सप्टेंबर १५३९)
१५६३ : शिखांचे पाचवे गुरु गुरु अर्जुन देव यांचा जन्मदिन.
१७०७ : स्विस गणितज्ञ लिओनार्ड ऑयलर यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर १७८३)
१७४१ : चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८२७)
१८९३ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (मृत्यू: २१ डिसेंबर १९७९)
१८९४ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ११ सप्टेंबर १९७१)
१९०१ : अजय मुखर्जी भारतीय राजकारणी यांचा जन्म.
१९१२ : मल्हार सदाशिव तथा 'बाबूराव' पारखे उद्योजक व वेदाभ्यासक (मृत्यू: १३ जानेवारी १९९७)
१९१२ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जुलै १९९४)
१९२२ : गीतकार हसरत जयपुरी यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९९)
१९३२ : कवी सुरेश भट यांचा जन्म. (मृत्यू: १४ मार्च २००३)
१९४० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिखर घराण्यातील शास्त्रीय गायक व सारंगी वादक उस्ताद सुलतान खान यांचा जन्मदिन.
१९६३ : भारतीय क्रिकेटपटू मनोज प्रभाकर यांचा जन्म.
१९७२ : प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्या, क्रिकेट ग्लॅमर, फॅशन मूर्ती मंदिरा बेदी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : मोरेश्वर रामचंद्र पराडकर उर्फ 'मोरोपंत' पंडीतकवी चैत्र शु. १५ (जन्म: ? ? १७२९)
१८६५ : अब्राहम लिंकन, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : जगप्रसिध्द टायटॅनिक बोटीला धक्का लागून जलसमाधी मिळाल्याने अनेक लोकांचा मृत्यू.
१९१२ : एडवर्ड जे. स्मिथ आर. एम. एस. टायटॅनिक जहाजाचा कप्तान (जन्म: २७ जानेवारी १८५०)
१९८० : जेऑं-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २१ जून १९०५)
१९९० : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९०५)
१९९५ : पंडित लीलाधर जोशी तत्कालीन मध्यभारत राज्याचे पहिले मुख्यमंत्री (जन्म:)
१९९८ : पॉल पॉट कंबोडियातील २० लाख नागरिकांच्या हत्याकांडास जबाबदार असणारा 'ख्मेर रुज'चा नेता (जन्म: १९ मे १९२५)
२०१३ : वि. रा. करंदीकर संत साहित्याचे अभ्यासक (जन्म: २७ ऑगस्ट १९१९)

# पपईवरील बुरशीजन्य रोगांवर एकात्मिक नियंत्रण उपाय

पपई हे उष्णकटिबंधीय हवामानात मोठ्या प्रमाणावर पिकवले जाणारे सर्वात स्वादिष्ट फळ आहे. या फळाची त्वचा अतिशय पातळ असते त्यामुळे अयोग्य हाताळणीमुळे हे पीक बुरशी आणि बॅक्टेरियामुळे विविध रोगांना बळी पडते. जाणून घेऊ या पपईवरील बुरशीजन्य रोग आणि त्यावर नियंत्रण उपाय.

करपा/अँथ्रॅक्नोज : या रोगाचा प्रसार प्रादुर्भावीत फळे, वारा, पावसाचे पाणी यामुळे होतो. या रोगाची सुरुवात हिरव्या, न पिकलेल्या फळांवर लहान चट्टे स्वरुपात होते. व नंतर मोठ्या फळांवर होते. या बुरशीजन्य रोगामुळे पिकलेली फळे सडतात, फळांच्या पृष्ठभागावर गोलाकार, तपकिरी, सपाट किंवा खोलगट चट्टे पडतात.

नियंत्रण उपाय : हिवाळ्यात दक्षिणेकडील सूर्य किरणांचे चटके बसून या रोगाचा प्रादुर्भाव होतो. फळे मऊ बनतात. म्हणून फळे तपकिरी रंगाच्या कागदाने झाकावीत किंवा फळाभोवती पॉलिथीन कागद गुंडाळावा. रोगाची बाधा झालेली फळे व पानांचे देठ काढून टाकावेत. ४५ दिवसांच्या अंतराने कार्बेन्डाझिम ०.१% फवारणी किंवा क्लोरोथॅलोनिल ०.२% १० ते १५ दिवसांच्या अंतराने किंवा १० दिवसांच्या अंतराने थायोफॅनेट-मिथाइल ०.१% किंवा मॅन्कोझेब ०.२% प्रति लिटर पाणी फवारणी या रोगाचे नियंत्रण करतात. बेंझिलिसो थियोसाइनेटची धूरी काढणीनंतरचे ठिपके आणि कुजणे नियंत्रित करते.

पायकूज किंवा बुंधा सडणे : हा बुरशीजन्य रोग ऑगस्ट, सप्टेंबर, आणि फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या महिन्यांत आढळतो. विशेषतः पाण्याचा चांगला निचरा न होणार्या जमिनीतील झाडांवर आढळतो. जमिनीच्या पृष्ठभागालगत झाडाच्या बुंध्याच्या सालीवर पाणी शोषलेले चट्टे दिसतात. झाडाच्या शेंड्यावरील पाने खाली वाकतात, सुकतात, पिवळी पडतात आणि अकाली गळून पडतात

नियंत्रण उपाय : लागवडीपूर्वी रोपवाटिका उन्हात चांगली तापू द्यावी. ३ ग्रॅम थायरम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. रोपे लावणीच्या वेळी २०० ग्रॅम शेणखतात ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळावी. पाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदावे, झाडाला दुहेरी बांगडी पद्धतीने पाणी द्यावे. शेतात खोल आंतरमशागत करू नये, झाडाच्या बुंध्याभोवती मातीची भर घालावी. रोगाची बाधा झालेल्या खोडावरील भाग खरडून काढून तेथे बोर्डो पेस्ट लावावी. १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा १ लिटर पाण्यात २ ग्रॅम कॉपर ऑक्सीफ्लोराईड मिसळून त्या द्रावणाची झाडाच्या बुंध्याजवळ फवारणी करावी. क्लोरोथॅलोनील किंवा मेटॅलॅक्झोन २ ग्रॅम/लिटर पाणी रोगग्रस्त झाडाच्या बुडाशी ओतावे.

काळे ठिपके : हा रोग सरकोस्पोरा या बुरशीमुळे होतो. पानांवर करड्या तपकिरी रंगाचे ठिपके पडतात. जास्त संक्रमण असल्यास पपईची रोगग्रस्त पाने पिवळी पडतात व सुकतात, फळांवर देखील ठिपके दिसतात.

नियंत्रण उपाय : ठिपके दिसून येताच डायथेन एम ४५, किंवा कॅप्टन, किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा कॉपर हायड्रॉक्साईड यापैकी एकाची २ ग्रॅम/लिटर प्रति लिटर पाणी याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने दोन वेळेस फवारणी घ्यावी.

भुरी : या बुरशीजन्य रोगाचा प्रसार कमी तापमान व जात दमटपणा यामुळे होतो. बुरशी पानांच्या खालील बाजूस वाढते. पानांच्या खालील बाजूस पांढ-या रंगाची भुकटी दिसून येते. प्रारंभिक अवस्थेत पानांच्या वरील बाजूने पिवळसर किंवा हलक्या हिरव्या रंगाचे ठिपके दिसून येतात. प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यास खोडावर देखिल पांढ-या रंगाची बुरशी दिसून येते.नियंत्रण उपाय : रोग प्रतिबंधक बियाण्यांचा वापर करावा. रोप लागवड करताना रोपात जास्त अंतर ठेवावे. रोपांना सकाळी लवकर पाणी द्यावे, पाणी मुळांशी द्यावे. संतुलित प्रमाणात खत द्यावे, नत्रयुक्त खताचा कमी वापर करावा. ५०० लिटर पाण्यात २ किलो पाण्यात मिसळणारे गंधक मिसळून द्रावणाची १५ दिवसांच्या अंतराने पानावर फवारणी करावी. कार्बेन्डाझिम ०.१% किंवा थिओफेनेट-मिथाइल ०.१% प्रति लिटर यांची एक महिन्याच्या अंतराने फवारणी प्रभावी ठरते.



# शेळीपालनातील चाऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन



पशुपालकांचा जवळजवळ ५० ते ६० टक्के खर्च हा जनावरांच्या आहारावर होतो. त्यामुळे कमीत कमी खर्चात जनावरांना चांगल्या पद्धतीचा पौष्टिक चारा कसा उपलब्ध करून देऊ शकतो यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जनावरांना वर्षभर चारा मिळावा म्हणून आपण वेगळ्या पद्धतीने चाऱ्याची साठवण करू शकतो आणि जनावराची चाऱ्याची गरज भागवू शकतो.

शेळयांच्या आहारामध्ये मुख्यत्वेकरून झाडपाल्याचा उपयोग केला जातो. असा चारा वाढून सुद्धा दिला जातो त्यामुळे गोठ्याच्या आजूबाजूला अशा झाडांची लागवड करून तुम्ही चाऱ्यावरील खर्च कमी करू शकतात. शेळ्यांच्या वाढीसाठी आवश्यक असणारा चारा वर्षभर उपलब्ध राहण्यासाठी चाऱ्याचे वर्षभरासाठी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. फायदेशीर शेळीपालनासाठी वर्षभर शेळ्यांच्या आहारामध्ये हिरव्या आणि वाळलेल्या चाऱ्याचा समावेश असायला हवा. शेळीला तिच्या वजनाच्या चार ते पाच टक्के शुष्क पदार्थांची आवश्यकता असते.पशुखाद्याचा विचार केला तर त्याच्यात ९०%,सुक्या चाऱ्यामध्ये ८९ टक्के आणि हिरव्या चाऱ्यामध्ये २० टक्के शुष्क पदार्थ असतात. तसेच एकदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण सात ते अकरा टक्के असते. तर एकूण पचनीय पोषकतत्वे ६५ ते ७० टक्के असतात. त्याचप्रमाणे द्विदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण १६ ते २० टक्केआणि एकूण पचनीय पोषक तत्वांचे प्रमाण ६० ते ६५ टक्के असते. जर आपण वाळलेल्या चाऱ्याचा विचार केला तर त्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण चार ते सहा टक्के असते आणि एकूण पचनीय पोषक तत्वांचे प्रमाण ५० ते ५५ टक्के असते. एकदल चारा पिकांमध्ये मका, कडवळ, बाजरी, ज्वारी, दशरथ घास, गिनी गवत इत्यादींचा समावेश होतो. तसेच द्विदल चारा पिकांमध्ये लसूण घास, बरसीम, भुईमूग, चवळी, सोयाबीन इत्यादी चारा पिकांचा समावेश होतो. शेळयांमध्ये चाऱ्याचे योग्य रित्या पचन व्हावेत यासाठी आहारामध्येवाळलेला चारा,हिरवा चारा, खुराक आणि मिनरल मिक्स्चर असणे आवश्यक आहे.

०००

चाऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन

१) शेळ्यांना वर्षभर चारा मिळावा म्हणून आपण वेगळ्या पद्धतीने चाऱ्याचे साठवणूक करू शकतो. त्यामुळे सुखा चारा वर्षभर साठवून ठेवावा अशा पद्धतीने साठवावा.सुक्या चाऱ्यावर अथवा भुसावर युरियाची प्रक्रिया करावी.

२) हायड्रोपोनिक चारा तयार करणे उत्तम असते. ३) अझोला तयार करणे. ४) मुरघास बनवून ठेवणे. ५) शेळ्यांसाठी घरच्या घरी पशुखाद्य तयार करणे. ६) शेळ्यांसाठी चारा म्हणून सुबाभूळ, शेवरी, अंजन वृक्ष इत्यादी झाडाची लागवड करू शकता. तसेच डी एच एन ६, गिनी गवत, पॅरा गवत, नेपियर, सुदाम गवत, दीनानाथ गवत, मारवेल इत्यादी चाऱ्याची लागवड करता येते. ७) तसेच शेतामध्ये आपण घेतो चे पीक घेतल्यानंतर उरलेला पालाशेळ्यांमध्ये चारा म्हणून वापरू शकता. फक्त यामध्ये जाड खोड असलेले पीक वापरणे टाळावे. योग्य चारा नियोजन करून आपण शेळीपालनातील नफा चे प्रमाण वाढू शकतो.

# शेणखतापासून बनतोय माशांचा चारा



शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल सांगणार आहोत, ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकता.

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका : भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच ने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

# देहाच्या पलीकडे गेल्याशिवाय खरा आनंद मिळत नाही-संदिपान महाराज हासेगावकर

बीड । प्रतिनिधी

देहतादात्मामुळे माणसास ताप येणे, डोके दुखणे, भूक लागणे ,चव जाणे, शौचास साफ न होणे हे विकार येऊन दुःख होत असते .अनर्थास कारणच देह आसक्तीआहे. याचा विसर पडल्यास प्रभूचे खरे प्रेम मागावे ते त्यांच्या कृपेने मिळते व त्यातून खरा आनंद मिळतो. म्हणजेच देहाच्या पलीकडे गेल्याशिवाय खरा आनंद मिळत नाही असे प्रतिपादन हरिभक्ति परायण ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर अध्यक्ष ,वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांनी श्रीसंत बंकटस्वामी महाराज यांच्या मौजे सावरगाव येथील फिरत्या ७२व्या नारळी सप्ताह मध्ये कालापूर्व कीर्तनात केले.



बीड तालुक्यातील सावरगाव घाट येथे गुरुनाम गुरु वैकुंठवासी प्रात: स्मरणीय बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य गुरुवर्य सुदाम देव बाबा यांनी सुरू केलेला, हरिभक्तिपरायण लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती गुरुवर्य बंकट स्वामी संस्थान निनगुर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व शुभहस्ते सुरू असलेल्या ७२व्या फिरत्या अखंड नारळी सप्ताहातील कालापूर्व कीर्तनात देवा आता ऐसा करी उपकार / देहाचा विसर पाडी मज //१ //या संत तुकाराम महाराज यांच्या सहा चरणी अभंगातून हरिभक्तिपरायण ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर हे प्रयत्नाने न मिळणारे जे प्रेम आहे ते देवाला मागावे असे सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्तिपरायण संदिपान महाराज हसेगावकर म्हणाले की, समाजाला योग्य दिशा देण्यासाठी योग्य मार्गदर्शन हवे आहे. समाजास काय करायचे ते संत त्यांना योग्य दिशेचा मार्ग देतात. सध्या या देशात पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण, अवलोकन करतो आहोत. त्यामुळे देशात, राज्यात भ्रष्टाचार ,बलात्कार, खून, दरोडे असे विघातक कर्म वाढलेलेआहेत. आपली पुढील पिढी जर सुसंस्कृत घडवायची असेल तर गावोगाव आपण संस्कार शिबिरे घेऊन विद्यार्थ्यांवर अनेक चांगले, परमार्थिक संस्कार रुजवावेत त्यामुळे विघातक प्रवृत्ती पासून देशाची भावी पिढी दूर राहील. असे प्रयत्न सार्वत्रिक करावेत. पुढे ते म्हणाले की, मानवी जीवनात सुख हवे असेल तर देहावरचे ममत्वच टाकले पाहिजे. देहाचा विसर पडला पाहिजे. तरीच हा जीव सुख पावे माझा/ देहाचा विसर पाडी मज/ त्यासाठी हे देवा माझ्या वृत्तीला चित्तास हमेशा आपल्या पायाजवळ जागा द्यावी अशी प्रार्थना करतात.

जीवनात खरे सुख जे आहे त्याच्या प्राप्तीसाठी देहाच्या पलीकडे गेल्याशिवाय, देहावरचे तातात्मे कमी केल्याशिवाय ते मिळणार नाही .तरीच हा जीव सुख पावे माझा/ त्यासाठी हे देवा माझ्या वृत्तीला चित्ताला हवे तर तुझ्या पायाजवळ जागा द्यावी अशी प्रार्थना करतात .जर मन, चित्त चंचल असेल तर ते दुःखाला कारणच आहे. आणि तेच जर स्थिर झाले तर मुक्त होते त्याचेच नाव मोक्ष किंवा सुख आहे. हे सुख आपल्या जवळच आहे. तैसा हृदयामध्ये मी रामू/ असता सर्व सुखाचा आरामु/ पण त्या चित्तात आस, चिंता ,लाज, काम, क्रोध हे विकार असल्यामुळे सुखापासून दूर जातात. अशाने सर्व जग अस्थिर झाले आहे. चिंताने ग्रस्त झाले आहेत आणि त्यातूनच दुःखाशिवाय दुसरे काहीच नाही. म्हणून ते देवाला आणखी काही मागतात की ,हेदेवा वाचेने नाम व संतांचे संगती द्यावी. ते आत्मज्ञान करून देणारी रुपडी आहेत. त्यांची सेवा केली तर त्यात वरपंगपणा न राहता देहाला विसरून दुःख जाते. आठवनाठव गेले भावाभाव/देहाचा विसर पाडी मज/ खरी सुखरूपता प्राप्त होते. हेच सर्वांनी करावे.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता ग्रामस्थ व परिसरातील लोकांनी अनमोल असे सहकार्य केले आहे हे शिस्तबद्ध कार्यक्रमातून दिसून येते. असेही ते म्हणाले. यावेळी हरिभक्तिपरायण श्री लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती, बंकट स्वामी मठ निनगुर, हरिभक्तिपरायण चोरमले महाराज संत तुकाराम महाराज संस्थान बेंनसुर, अरुण नाना डाके रामहरी रसाळ गुरुजी मांजरसुंबा, हरिदास भाऊ जोगदंड वानगाव, अनंत घीगे साहेब पत्रकार, ज्ञानेश्वर माऊली चव्हाण ,अरुण बावणे ,गोरक्ष कदम गवारी, नवनाथ कुलकर्णी, मोहन देवगुडे गुरुजी शिंदे सात्रा ता. कळंब सोंडगे गुरुजी, सुधाकर भोसले गुरुजी,गायनाचार्य म्हणून अभिमान ढाकणे गुरुजी वसंत महाराज शिंदे रणजीत महाराज शिंदे, दिनेश महाराज काळे, तर मृदंगमणी म्हणून ताल महर्षी ओमकार कागदे मोरगाव, प्रमोद पदमुले गुरुजी, बेलापुरी व हजारोंच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.१४ एप्रिल सोमवार रोजी राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष शंकर निर्मळ यांनी केले.आभारप्रदर्शन उपाध्यक्ष अमोल निर्मळ यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य,समता, बंधुता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. प्रा.लेनाजी गायकवाड यांनी आदर्श डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात यावी हे कविता सादर केली.यावेळी राजाभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ ,बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात,रमेश गायकवाड, सुरेश निर्मळ,अँड.गणेश वाणी, रामदास मुळे,दादा गायकवाड, संतोष भोसले आदी सहभागी होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असुन अध्यक्षपदी शंकर ऊर्फ रिंकु निर्मळ यांची तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड करण्यात आली.सचिवपदी स्वप्निल वक्ते,कोषाध्यक्ष पदी स्वप्निल निर्मळ, सभासद म्हणून सुमेध निर्मळ, स्वप्निल निर्मळ,सौरभ निर्मळ, प्रकाश निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड यांची आरूण निर्मळ,जितु निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ,पोपट निर्मळ बन्सी निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी भिमजयंती साजरी करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## थोडक्यात




माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे,सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे ,लेखापाल उद्धव फपाळ व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव



माजलगाव: लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव कारखाना कार्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, कर्मचारी संघटना उपाध्यक्ष दत्ता सोळंके, अशोक पाटील,दासराव मोरे,अजय लगड, राहुल सावंत, अशोक तिडके, उल्हास मुजमुले, अर्जुन गालफाडे आदी



बीड: भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन, अभिवादन करताना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, माजी आ.जनार्धन तुपे, सुशीलाताई मोराळे, अशोक हिंगे, राजू जोगदंड,बबन वडमारे, अजय सवाई आदी.



बीड:विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्तिक जन्मोत्सवा निमित्त ''तुलसी'' शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रोडे सर यांनी आयोजित केलेल्या स्नेह भोजन व अभिवादन कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी उपस्थित राहून दोन्ही महामानवांना अभिवादन केले.



बीड : भारतीय संविधानाचे जनक परमपूज्य, महानायक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने अनुक्रमे भीम नगर व आंबेडकर चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना डॉ. संजय तांदळे व बाजीराव ढाकणे दिसत आहेत.

## सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

### संगीत विभाग व महिला शिक्षिकांच्या भिम गीताने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर , उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी संगीत विभाग व श्रीमती स्मिता पांडे,श्रीमती जया नागरगोजे, श्रीमती प्रज्ञा देशपांडे,श्रीमती स्वप्ना देशपांडे यांनी भीम गीते, बहारदार भीम गीत सादर केले. यासाठी संगीत साथ कुणाल कुलकर्णी,प्रथमेश



खुर्पे,श्रीमती अपर्णा मुळे यांची लाभली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप यांनी सांगितले की, भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर यांनी केले.

आभार व सुत्रसंचलन श्रीमती पल्लवी कानडे यांनी केले, कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला. यानंतर शहरातील भीमनगर भागातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, स्थानिक संस्था सभासद प्रेमकिशोर मानधने, जगदीश साखरे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच इयत्ता दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

## आज पांगरी येथे इंदुरीकर महाराजांचे किर्तन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पांगरी (मारुतीची) येथे हनुमान यात्रा निमित्त दि.१३ एप्रिल २०२५ पासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात सुरू झाला असून दि.१३ ते २२ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व यात्रा उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्त आज दि.१५ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे किर्तन होणार आहे.या किर्तनाचा व संपूर्ण विविध धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी लाभ घेऊन उपस्थित राहावे असे आवाहन पांगरी व अंतर्गत वाडी-वस्तीतील ग्रामस्थांनी केले आहे.

## युसूफवडगांव येथे जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी भिमनगरमधील विहारामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी माजी पं.स सदस्य उमाकांत भुसारी,उपसरपंच महेश लामतुरे,डॉ.महादेव कोरसळे,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी व शिवदास थळकरी यांच्या हस्ते महामानव भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी त्रिसरण,पंचशील बुध्दवंदना घेण्यात आली तसेच भारतीय संविधान उद्देशिकेचे



सामुहिक वाचन करण्यात आले.यावेळी जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड,रूपेश बोरगावकर,सचिन जावळे,दादा निकम,गणेश जावळे,सोमनाथ वैरागे,वैजनाथ थळकरी,सुरेश चोपणे,शहाजी शिंदे,बांबु शिंदे,बापुराव चोपणे,सुर्यकांत थळकरी,पिंटु चोपणे,अरूण राऊत,नागनाथ मुकदम,मल्लिकार्जुन गडकर,भाऊ चोपणे,बाळासाहेब लामतुरे,शिवहार थळकरी,सुनिल चोपणे,प्रविण वैरागे,विजय राऊत तसेच बौद्ध उपासक,बौद्ध उपासिका भिम अनुयायी,ग्रामस्थ मंडळी व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जय हनुमान तालीमला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत दोन सिल्वर



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय हनुमान तालीम चुंबळी फाटा येथील अजय गीताजी बहिरवाळ ५५ किलो वजन गटात सिल्वर मेडल त्याचे एका गुणाने सुवर्णपदक चुकले, व शुभम परजणे ५१ किलो वजन गटात सिल्वर मेडल मार्गदर्शक बाळासाहेब आवारे शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहेत ,यावेळी त्यांचा सत्कार सुदर्शन चव्हाण प्रतिष्ठित व्यापारी (वामनभाऊ ट्रेडर )व युवा नेते आनंद जाधव (पिंटू शेठ )यांच्या हस्ते रोख बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला . ही स्पर्धा मामासाहेब मोहोळ कुस्ती संकुल कात्रज पुणे येथे ,महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद अंतर्गत ४५ वी कुमार राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा दिनांक १२ एप्रिल ते १३ एप्रिल यादरम्यान घेण्यात आली यावेळी उपस्थित बाळू कदम कुस्ती प्रशिक्षक, किशोर भाकरे व दत्ता देशमाने (माणुसकीची भिंत ), दादा कदम, रमेश चव्हाण ,किशोर भोसले बहुसंख्य मल्ल उपस्थित होते.

## अँड. विशाल मस्के यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह राज्यातील राजकारणात रोज नवनविन घडामोडी घडताना दिसत आहेत. प्रत्येक पक्ष आपली संघटनात्मक बांधणी मजबुत करताना दिसत आहे. अशातच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात देखील मागील काही दिवसांपासुन खुप मोठे बदल घडताना दिसत आहेत. भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पक्षाचे नुतन प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटनात्मक बांधणी वर भर दिला असुन प्रत्येक जिल्ह्यासाठी निरिक्षकाची नेमणुक करून त्यांना प्रत्येक जिल्हातील सध्यस्थितीतील पक्षाच्या स्थितीचे अहवाल मागवले आहेत.

बीड जिल्ह्यासाठी निरिक्षक म्हणुन महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कमिटी चे सरचिटणीस अमर खानापुरे यांची निवड करण्यात आली आहे. ते दि. ८ एप्रिल २०२५ रोजी बीड जिल्ह्यात आले असता बीड जिल्हा काँग्रेस कमीटी च्या वतीने महिला महाविद्यालय बीड येथे पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, या बैठकीस युवा नेते तथा प्रदेश सचिव आदित्य दादा पाटील, बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, बीड जिल्हा सरचिटणीस भास्कर



तात्या केदार, विधी सेल प्रदेश सरचिटणीस अँड. गणेश करांडे, बीड तालुकाध्यक्ष गणेशदादा बजगुडे पाटील, केज तालुकाध्यक्ष प्रविणकुमार खोडसे, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, माजलगाव तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील, तसेच जिल्हात व महाराष्ट्रात विविध पदावर विराजमान असलेले सर्व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व परिचित असलेले संविधानवादी सामाजिक कार्यकर्ते अँड. विशाल मस्के यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात उपस्थित मान्यवरांच्या व पदाधिकारींच्या उपस्थितीत जाहिर पक्ष प्रवेश केला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अँड. विशाल मस्के यांनी सांगितले की, हा देश भारतीय संविधानानुसार चालतो, देशात समता, न्याय, बंधुता व एकात्मता टिकवुन ठेवायची असेल तर भारतीय संविधान गरजेचे आहे, परंतु देशात काही संविधान विरोधी लोक आहेत त्यामुळे देशातील जनता व भारतीय संविधानाला धोका निर्माण होऊ शकतो. भारतीय संविधान वाचवण्याची जिम्मेदारी देशाचे नेते आदरणीय राहुलजी गांधी यांनी घेतली असल्याने तसेच पक्षाची ध्येय, धोरणे व विचार एकसमान असल्याने सव्वाशे वर्षांपासुन एक वैचारिक पक्ष म्हणुन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष अस्तित्वात असल्याने मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला असल्याचे यावेळी अँड. विशाल मस्के यांनी सांगितले. अँड. विशाल मस्के यांचे विचार व कार्य नेहमीच संविधानवादी, समतावादी व बंधुत्व वादी राहिले असुन त्यांचा बीड जिल्ह्यात मोठा संपर्क आहे, तसेच ते मागील काही दिवसांपासुन काँग्रेस पक्षाच्या संपर्कात होते व दि. ८ एप्रिल २०२५ रोजी त्यांनी पक्षात जाहिर प्रवेश केला. दि. ८ व ९ मार्च रोजी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे नेतृत्वातील मस्साजोग ते बीड सदभावना पदयात्रेत देखील अँड. विशाल मस्के यांनी सक्रीय सहभाग नोंदवुन बीड जिल्ह्यातील जनतेला सदभावना जपन्याचे आवाहन त्यांनी वर्तमान पत्रांच्या माध्यमातून केले होते.

# राष्ट्राला आज भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या नवी दिशा देणाऱ्या आदर्शाची खरी गरज आहे – राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतरत्न , बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज संपूर्ण देशविदेशात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अंबाजोगाई शहरात देखील माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे परमपूज्य , बोधिसत्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी राष्टाला आज खऱ्या अर्थाने बाबासाहेबानी घालून दिलेल्या आदर्शाची खरी गरज असल्याचे परखड भावना व्यक्त केली. यावेळी राजकिशोर मोदी यांच्या समवेत मनोज लखेरा, महादेव आदमाणे ,चंद्रशेखर वडमारे ,डॉ राजेश इंगोले, पंडित हुलगुंडे, धम्मा सरवदे, अमोल लोमटे, राजू मोरे, सुनील वाघाळकर, बबन पानकोळी, माणिक वडवनकर , सुभाष पानकोळी, सुधाकर टेकाळे, सय्यद रशीद, गोविंद पोतंगले , अंकुश हेडे, मतीनं जरगर, राम घोडके, जावेद गवळी, अकबर पठाण, शाकेर काझी, दत्ता सरवदे, खलील जाफरी, रफीक गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, विशाल पोटभरे, शरद काळे, अस्लम शेख, संतोष चिमणे, सुगत सरवदे, सुमित सुरवसे, रोशन लाड, अनिस पठाण, यांच्यासह अनेक सहकारी सहभागी झाले होते.




डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथिल बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पत बाबासाहेबांचा जयघोष व जयजयकार करून त्यांना अभिवादन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, पिडीत तथा वंचितांच्या कल्याणासाठी वेचले. साधारणपणे पंच्याहत्तर वर्षांपूर्वी बाबासाहेबानी देशाला संविधान बहाल केले. त्या संविधानाच्या बळावरच आपला देशाचा कार्यभार चालतो आहे. मात्र गेली काही काळापासून विविध राजकीय पक्ष आपल्या सोयीनुसार त्या घटनेची पायमल्ली करतांना आढळून येत आहेत.



**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात संपन्न**

त्यामुळेच आजची राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती ही देखील विस्कळित होऊ पहात आहे. त्यामुळेच आज सद्यस्थितीत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याकाळी घालून दिलेल्या आदर्शाची खरी गरज भासत असल्याचे मत याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले.

बाबासाहेबांनी आपले जीवन सामाजिक न्याय आणि समानतेसाठी समर्पित केले. त्यांनी अस्पृश्यता आणि जातीभेदाविरुद्ध लढा दिला. दलित, महिला आणि दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. बाबासाहेबांनी युवकांना व्यसनाच्या आहारी न जाता किंवा कुणाचीही गुलामगिरी न पत्करता शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही शिकवण दिली. अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास करून सर्वोत्कृष्ट अशी भारतीय राज्यघटनेच्या निर्माण केली. तीच घटना आज जगात सर्वोत्तम म्हणून ओळखल्या जात आहे व याच घटनेचे अनुकरण अनेक देशाकडून केल्या जात असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सांगितले. यापुढे समाजाला नवी दिशा देणारे,।नव कल्याणकारी विचार व आदर्श आपण सर्वजण पुढे घेऊन जाण्याचा संकल्प करूया व देशात नवनिर्माण घडवूया असा संकल्प देखील यावेळी राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला.



**बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त परळीत धनंजय मुंडे यांनी केले अभिवादन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी सकाळी ११ वाजता परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

धनंजय मुंडे यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना भीम जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजूस आंबेडकरी अनुयायांच्या वतीने चिमुकल्या विद्यार्थ्यांना मोफत वही व पेन वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या उपक्रमातही धनंजय मुंडे यांनी सहभाग घेऊन आपल्या हाताने विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप केले.



## भीम जन्मोत्सवाच्या दिल्या शुभेच्छा, मोफत वही – पेन वाटपात घेतला सहभाग

यावेळी युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, रवींद्र परदेशी, डॉ. विनोद जगतकर, अभय मुंडे, इंटकचे दत्तात्रय गुट्टे, अनंत इंगळे, रवी मुळे, अमर रोडे, भीमराव डावरे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, सय्यद सिराज, लक्ष्मण मुरकुटे, महेंद्र रोडे, गणेश मुंडे यांसह पदाधिकारी व असंख्य अनुयायी उपस्थित होते.

# सांगवी पाटण येथे भैरवनाथ यात्रा उत्साहात

## दर्शन घेण्यासाठी नाथ भक्तांनी केली अलोट गर्दी



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये ११ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पैठण,नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात आली.

१२ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी, दंडवत, लोटांगण घेऊन भाविक भक्तांनी नवस पूर्ण केले, तीन ते सहा यावेळेस मुख्य आकर्षण, बँजो, डिजे, डोल, ताशा . लेझिम , हलगी पथक,युवकांचा डान्स, भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न झाला , रात्री सहा ते आठ यावेळेस अंबिल घुगऱ्या वाटण्याची जुनी परंपरा अजूनही कायम आहे. नंतर रात्री छबिना काढून गावात रातभर मिरवणूक काढण्यात आली , पहाटे शोभेच्या दारूची आतिश बाजी करण्यात आली, यावेळी बघणाऱ्यांच्या डोळ्याचे पारने,फिटले यात्रेमध्ये खेळणी दुकाने, खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली गेली होती, यात्रेमध्ये भावी नवरदेव यांनी दर्शनासाठी जास्त गर्दी केली होती,नंतर १३ एप्रिल या दिवशी कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार झाला ,पंचक्रोशीतील पाटण, कोहिनी, खीळद, लिंबोडी, बावी,डोईठाण, सुरुडी, धामणगाव, कारखेल,लमाणतांडा, पुणे, मुंबई, अ.नगर, तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविक भक्तांनी भैरवनाथांचे दर्शन घेतले , अशाप्रकारे सांगवी पाटण गावची यात्रा गुण्यागोविंदाने ,मिळून मिसळून साजरी झाली.

## सारणी येथे सांस्कृतिक कार्यक्रमांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

सारणी । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील लहान, थोर तसेच महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कलेचे प्रदर्शन गावकऱ्यासमोर केले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांनी भीम गीतावर नृत्य सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर भाषणे सादर केली तसेच गावातून शासकीय सेवेत रुजू झालेल्या युवकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सरपंच शीला राहुल ओव्हाळ यांच्या मार्फत उपस्थित विद्यार्थ्यांना लिहिण्याचे पड बक्षीस दिले. कार्यक्रमाला उपसरपंच खाजाभाई तसेच ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक वैजिनाथ धस, सहशिक्षक हरीश कांबळे यांच्यासह गावातील तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्थाविक राहूल ओव्हाळ यांनी केले तर सुत्रसंचलन वैजिनाथ धस यांनी केले आणि आभारप्रदर्शन गोविंद ठोंबरे यांनी केले. यावेळी अल्पोपहाराची सोय ग्रा.पं.सदस्य बालासाहेब देशमुख यांनी केली होती.



**भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज बीड शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व उपस्थित सर्व भिमसैनिकांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी रिपाई चे तालुका अध्यक्ष किशनजी तांगडे, रासप चे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेबजी मतकर,तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेबजी कांबळे, युवा नेते दिपक घोडके पाटील,राम वडमारे सह सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..!**

# युनियनच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे–आ. विजयसिंह पंडित

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना युनियनच्या वतीने अभिवादन

गेवराई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज ऑटो रिक्षा युनियन गेवराई यांच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आ. विजयसिंह पंडित हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शाम येवले, विकास गायकवाड, शेख बाबा, पप्पू पठाण,वसीम फारूकी, राजु पठाण, प्रभाकर भालशंकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य एका समाजापुरते मर्यादित नाही तर सबंध देशातील लोकांना एक संघ ठेवण्याचे काम त्यांच्या विचारांनी केले आहे. त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपण वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालो आहोत. आज मी आमदार या संविधानिक पदावर आहे हे त्याचेच फलित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आपल्याला पुढे घेऊन जायचे आहेत. रिक्षा युनियनच्या पाठीशी मी मागे ही होतो आणि यापुढेही राहील. आपल्या काही समस्या असतील, अडचणी असतील तर त्या सोडवण्याचा मी प्रयत्न करेल असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी छत्रपती शाहू महाराज ऑटो रिक्षा युनियन अध्यक्ष सतीश प्रधान, उपाध्यक्ष धर्मा पवार, सचिव नामदेव पवार, कोषाध्यक्ष भोला शंकर सुतार, सतीश राठोड, शेख खाजा, महात्मा धूले, शेख राजू , संतोष पवार, विशाल सुतार, अमर भाई, रोहिदास पवार, सरकार जाधव, ससाने, राम शिंदे, अप्पा मस्के,संदीप काळे, संभा शिंदे, गुजारे अक्षय शिंदे, संदीप सुतार आदी रिक्षा युनियनचे पदाधिकारी व सदस्य यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष प्रधान यांनी केले.

# शहरातील वार्ड क्रमांक १४ मधील भुयारी नालीचे चेंबर फुटले

**शिरूर । शंकर भालेकर**

शिरूर शहरातील वार्ड क्रमांक १४ मधील भुयारी नाल्याचे काम मागील काही महिन्यांमध्ये झाले असून सदरील काम हे निष्कृष्ट दर्जाचे झाले असून संबंधित गुत्तेदाराने अंदाजपत्रकानुसार काम न केल्याने सदरील भुयारी नालीची लेव्हल न झाल्याने सदरील नालीतच पाणी तुंबले आहे तसेच चेंबर सुद्धा ठराविक अंतरावर टाकले नसून परिसरात सर्वत्र नालीची दुर्गंधी पसरली आहे तसेच चांगला सिमेंट रस्ता खोदून मधोमध नाली केल्याने रस्त्या ही खराब झाला असून या प्रभागामध्ये जवळपास सहा महिन्यापासून घंटागाडी सुद्धा



**रस्त्यासाठी ही फरपट नागरिकांचा आंदोलनाचा इशारा दुचाकी चालवणे ही अवघड!**

या ठिकाणी आली नसून मोठ मोठे खड्डे पडल्याने दुचाकी सुध्दा चालवता येत नाही तर चार चाकी वाहन सुध्दा या वॉर्डातील रस्त्यावर येत नाही अशी दुरावस्था या रस्त्याची व नालीची झाल्यामुळे नागरिक संतप्त झाले व त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपंचायत शिरूर कासार यांना निवेदन देऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा यावेळी या नागरिकांनी निवेदनाद्वारे दिला आहे. ॲड. संतोष ढाकणे, मोहन खेडकर ,विठ्ठल तेलंग ,दिलीप वारे, रोहिदास आमले ,भीमराव खेडकर, अमोल मिसाळ, राजेंद्र विघ्ने, गणेश सानप, राहुल मिसाळ, उमेश सानप, महेश जरांगे ,संतोष आतकरे, शिवाजी जरांगे ,मुकेश काळे, सोमनाथ खरात ,अर्जुन सानप, सुनील ढाकणे आदी जणांच्या निवेदना वर सह्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मंगेशकर रूग्णालयाच्या अडचणी वाढणार ? ससूनचा अहवाल आल्यानंतर ; काय म्हणाल्या चाकणकर ?

पुणे । प्रतिनिधी

दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील घटनेचा ससून रुग्णालयाच्या उच्च स्तरीय समितीचा अहवाल प्राप्त होईल. त्यात कोणी दोषी असेल तर कारवाई केली जाणार आहे, असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी म्हटले आहे. पुण्यात पत्रकारांशी त्या बोलत होत्या. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर आरोप केले जात आहेत. या प्रकरणात दोन चौकशी अहवाल प्राप्त झाले आहेत.

उद्या (दि. १५ मंगळवारी) ससून रुग्णालयाच्या उच्चस्तरीय समितीच अहवाल प्राप्त होणार आहे. यासंदर्भात चाकणकर म्हणाल्या, 'मृत महीला तनिषा भिसे हिची खासगी माहिती रुग्णालयाकडून सार्वजनिक करण्यात आली आहे. याबाबत अलंकार पोलिस ठाण्यात तक्रार देखील भिसे कुटुंबाकडून देण्यात आली आहे. पहिल्या दिवसापासून या प्रकरणाचा पाठपुरावा केला जात आहे. जे दोषी असतील त्यांच्यावर निश्चित कारवाई होईल. पुढे कोणावरही असा प्रसंग ओढवू नये याची जबाबदारी आम्ही घेतली आहे.'




दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय असल्याने धर्मदायुक्तांचा अहवाल असणे गरजेचे आहे. माता मृत्यू असल्याने माता मृत्यू अन्वेषण समितीचा अहवाल असणे देखील गरजेचं आहे. तात्पुरत्या स्वरूपातील कोणतीही कारवाई होणार नाही, असे चाकणकर म्हणाल्या.

राज्य महिला आयोगाने मुख्यमंत्र्यांकडे केली 'ही' मागणी

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला चौकशी अहवाल दि.८ एप्रिल रोजी विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांना सादर केला असून विभागाने अहवाल मा.मुख्यमंत्री यांना सादर केला आहे.आज दि.११ एप्रिल रोजी पुणे महानगरपालिकेच्या माता मृत्यू अन्वेषण समितीचा अहवालही प्रशासनास सादर करण्यात आला आहे.या दोन्ही चौकशी अहवालावर राज्य शासन तातडीने कारवाई करावी अशी राज्य महिला आयोगाची मागणी आहे.

'दीनानाथ मंगेशकर रुग्णालय' परिसरात जमावबंदी

गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणानंतर दिनानाथ मंगेशकर रुग्णालय परिसरात गेल्या काही दिवसांपासून आंदोलने होत आहेत. त्यामुळे या परिसरात तणावाचे वातावरण असते. यापार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होऊ नये यासाठी पुणे पोलिसांनी या परिसरात जमावबंदीचे आदेश काढले आहेत. गर्भवती महिलेच्या मृत्यूनंतर रुग्णालयासमोर विविध राजकीय पक्ष तसेच संस्था व संघटनांकडून रुग्णालयाबद्दल विरोध केला जात आहे. रुग्णालयाच्या दारात आंदोलन केले जात आहे. आंदोलनात नावाला काळे फासणे, शाई फेकने, चिल्लर फेकण्याच्या घटना घडल्या. तर, रुग्णालयाच्या टेरेसवर जाऊन आंदोलन करण्यात आले. यामुळे येथे येणाऱ्या रुग्णांनाही याचा त्रास होतो. सोबतच परिसरात गर्दी होते. परिणामी वाहतूक कोंडीही होते. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी दीनानाथ रुग्णालय परिसरात जमावबंदीचे आदेश दिले आहेत. याबाबतचे आदेश सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिले.



# पुण्याला अवकाळीने झोडपले; 'या' भागात गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

ओतूर: गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल होऊन रविवारी(दि,१३)रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अचानक पावसाचे वातावरण तयार झाले होते. त्यांनतर जुन्नर तालुक्यातील काही भागात विजेच्या कडकडाटासह जोरदार मुसळधार पावसासह गारपीट होऊन शेतमालाचे अतोनात नुकसान झाले असल्याने शेतकर्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

काढणीसाठी आलेल्या कांदा पिकासह तरकारी पिकांचे व आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दरम्यान कल्याण-नगर महामार्गावर वाटखळे गावच्या हद्दीत वादळी वाऱ्याने महामार्गलगतची झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतूक बंद झाली होती. डिंगोरे,कोळवाडी,मढ, वाटखळे,खुबी, खिरेश्वर, पिंपळगाव जोगा,पारगाव आदी भागातील काही शेतकर्यांनी कांदा,बाजरी, गहू, हरभरा काढून शेतामध्ये ठेवल्याने ते पूर्णपणे भिजले असल्याने हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे.सोबतच लागवड केलेल्या टोमॅटो, मिरची,झेंडू,फ्लॉवर, कोबी,काकडी,आंबा पिकांचे देखील नुकसान झाले आहे.दरम्यान नुकसान झालेल्या पिकांचे कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून तातडीची आर्थिक मदत शेतकऱ्यांना द्यावी, अशी मागणी डिंगोरे पिंपळगाव जोगा जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य अंकुश आमले यांनी केली आहे.

# शेताच्या बांध्याजवळ लिंबू-नारळ, बाहुल्या; जादूटोण्याच्या प्रकाराने परिसरात खळबळ

शिरूर, कवठे येमाई: पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कवठे येमाई च्या घोडे,भाईक वस्ती नजीकच्या एका शेतकऱ्याच्या शेताच्या बांधा नजीक ५ नारळ,५० साठ लिंबे, त्यावर टाचण्या,दाभण टोचलेल्या,कणकेच्या केलेल्या ५,६ छोट्या बाहुल्या, काही दारूच्या बाटल्या,व तत्सम जादू टोना केलेलं साहित्य आज रविवार दि. १३ ला सकाळी संबंधित शेतकरी संपत मोहन भाईक यांना आढळून आले. ते टोमॅटो पीक घेण्यासाठी तयार केलेल्या आपल्या शेता नजीकच्या बांधावरील वाळलेले गवत व कचरा जाळताना हा अघोरी प्रकार आज सकाळी त्यांच्या निदर्शनास आला.

संपत भाईक तात्काळ २ किमी अंतर असलेल्या त्या शेताच्या ठिकाणी गेले.संबंधित वस्तूंची पाहणी करीत हे सर्व थोतांड व अंधश्रद्धेचा प्रकार असून घाबरून जाऊ नका असा उपस्थित शेतकऱ्यांना दिलासा दिला.त्यानंतर या घटनेबाबत अंध श्रद्धा निर्मूलन समितीच्या महाराष्ट्र प्रदेश राज्य कार्यकारिणी सदस्या नंदिनी जाधव व शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना ही माहिती देण्यात आली.

नंदिनी जाधव यांनी कवठे येमाईचे शेतकरी संपत भाईक यांच्या शी मोबाईल वरून थेट चर्चा करीत हा अंधश्रद्धेचा प्रकार असून घाबरून जाऊ नका असा दिलासा



दिला. त्यानंतर शेतकरी संपत भाईक व त्यांचा घरगडी लक्ष्मण यांनी हे सर्व साहित्य शेताच्या कडेला नेत वाळलेल्या गवतावर ठेवत पेटवून दिले.हा प्रकार अष्टविनायक महामार्गाच्या नजीकच झाल्याने बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान दोन आठवड्यांपूर्वी सांगलीतील इस्लामपूरमध्येही असाच जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला होता. इस्लामपूर येथील उरूण भागात एका महिलेच्या घराबाहेर जादूटोणा आणि करणीसदृश साहित्य आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. हा प्रकार समजताच नागरिकांनी त्या ठिकाणी पाहणीसाठी मोठी गर्दी केली. मात्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ हस्तक्षेप केला. त्यांनी कुटुंबीयांसह लोकांचे प्रबोधन करत, पोलिसांच्या उपस्थितीत ते सर्व साहित्य बाजूला केले आणि परिसरात पसरलेले भीतीचे वातावरण दूर करण्याचा प्रयत्न केला.

सदर महिलेच्या घराबाहेर विचित्र स्वरूपाचे साहित्य ठेवलेले होते. त्यांच्या बकऱ्याचे डोके आणि चार पाय रंगीत दोरीने दरवाजाच्या बाहेर टांगलेले होते. त्यावर लिंबू, टाचण्या आणि सुया टोचलेल्या होत्या. दरवाजाजवळ तीन नारळांवर काळ्या बाहुल्या बांधून त्यावरही टाचण्या टोचलेल्या होत्या. २१ अर्धवट कापलेले लिंबू, मिरच्या, काट्यांची फांजर, मोडलेली फांदी, पपई, कोरफडीचे तुकडे, तसेच हळद, कुंकू आणि गुलाल यांचा वापर त्या ठिकाणी झालेला दिसून आला. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# धक्कादायक! लघुशंका करताना शिंतोडे उडाल्याने तरुणाचा खून

पिंपरी : लघुशंका करताना शिंतोडे उडाल्याने दोघांनी एका व्यक्तीला मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. वाकड येथील भूमकर चौकात गुरुवारी (दि.१०) रात्री साडेआठच्या सुमारास मारहाणीचा हा प्रकार घडला होता.




राहुल कचरू घेवंदे (वय ४०, रा. भूमकर वस्ती, वाकड, मूळगाव चिखली. जि. बुलढाणा) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी राहुल यांच्या पत्नीने शनिवारी ( १२) हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यश सुनील कलाटे (२२), मारुती किसन गुंडेकर (२१, दोघेही रा. कलाटे वस्ती, वाकड) यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल घेवंदे हे भूमकर चौकाजवळील मोकळ्या मैदानातून घरी जात होते. त्यावेळी तेथे यश कलाटे आणि मारुती गुंडेकर लघुशंका करत होते. त्यांच्या बाजूला राहुल घेवंदे देखील लघुशंका करत होते. त्यावेळी लघुशंकेचे शिंतोडे यश कलाटे याच्या पायावर पडले. त्या कारणावरून त्यांनी राहुल यांना शिवीगाळ केली. तू येथे लघवी का करतो, तुला निट लघवी करता येत नाही का, असे म्हणून संशयितांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात राहुल गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान शनिवारी (दि. १२) त्यांचा मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

पाण्याच्या टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

खेड तालुक्यातील बिरदवडी चौक वाय जंक्शनजवळ पाण्याच्या टँकरने दिलेल्या जबर धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. हा अपघात ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता घडला. अपघातानंतर टँकर चालक घटनास्थळावरून पसार झाला.या घटनेबाबत महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात सचिन अरुण कड (वय ३५, व्यवसाय - शेती, रा. संतोष नगर भाम, ता. खेड, जि. पुणे) यांनी तक्रार दाखल केली आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांना त्यांचे मामा उल्हास गाडे यांनी फोनवरून सांगितले की, त्यांच्या चुलत्याचा अपघात झालेला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या नावाने बनावट पेजद्वारे फसवणूक; विद्यापीठाकडून सावधगिरीचा इशारा


मृत्यू झालेल्या राघु ज्ञानोबा कड (वय ५७, रा. संतोष नगर भाम) हे त्यांच्या क्टीवा दुचाकी (क्र. एमएच १४ एचए ५९३७) वरून आंबेठाण चौकाहून सुधवडी गावाच्या दिशेने जात होते. त्याचवेळी बिरदवडी चौक वाय जंक्शनजवळ पाठीमागून भरधाव आलेल्या पाण्याच्या टँकरने (क्र. एमएच १२ एचडी १३६४) त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली.या अपघातामुळे राघु कड रस्त्यावर पडले आणि टँकरचे पुढचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. गंभीर जखमांमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर टँकर चालकाने कोणतीही मदत न करता पळ काढला. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, हा अपघात चालकाच्या निष्काळजीपणामुळे, वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून टँकर बेदरकारपणे चालविल्यामुळे झाला.

# 'उत्पादन' शुल्क विभागाकडून 3 हजार कोटींचा महसूल जमा

पुणे/बारामती: राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने जिल्ह्यात महसूली उत्पन्न, गुन्हे अन्वेषण तसेच अनुज्ञप्त्यांवर कारवाईच्या बाबतीत गतवर्षीपेक्षा भरीव कामगिरी केली आहे. या माध्यमातून सन २०२४-२५ या वर्षात २ हजार ९९८ कोटी ३३ लाख रुपये इतका महसूल जमा झाला आहे. सन २०२३- २४ च्या २ हजार ७२९ कोटी ४४ लाख रुपयांच्या तुलनेत महसुलात ९.८५ टक्के वाढ झाली आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी दिली.

जिल्ह्यात सन २०२४-२५ आर्थिक वर्षांत ५ हजार ९९५ गुन्हे नोंदविण्यात आले असून, ५ हजार ८९१ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत ६२१ वाहनासह २५ कोटी ८० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ९३ अन्वये ५७७ प्रस्ताव संबंधित दंडाधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आले आहेत. सदर सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे २९९ बंधपत्र घेण्यात आले असून, रक्कम २ कोटी १८ लाख रुपये रकमेची बंधपत्रे घेण्यात आलेली आहेत.

एमपीडीए कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या एकूण ९ प्रस्तावांपैकी १ प्रकरणात सराईत गुन्हेगारांविरुद्ध स्थानबद्धतेची




कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनुज्ञप्तीचे वारंवार सखोल तपासणी करुन नियमबाह्य बाबी आढळल्यास संबंधिताविरुद्ध कठोर कारवाई येत आहे.

सन २०२४-२५ वर्षात एकूण ५६९ अनुज्ञप्तीविरुद्ध विभागीय गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामध्ये ४ अनुज्ञप्ती कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत. या विभागीय विसंगती प्रकरणात १ कोटी ८६ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

अवैध ठिकाणी मद्य सेवन करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६८ व ८४ नुसार धाब्यांवर अवैध मद्य विक्री करणाऱ्याविरुद्ध तसेच अवैध ठिकाणी मा सेवन करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध एकूण ४५५ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यामध्ये १ हजार २५० आरोपीना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाद्वारे आरोपींना एकुण ८ लाख १९ हजार रुपये आर्थिक दंड ठोठविण्यात आलेला आहे. यामुळे केवळ अवैध मद्य विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई न करता त्यासोबत या ठिकाणी मद्यसेवन करणाऱ्यांविरुध्द सुध्दा कारवाई करण्यात आली आहे. यामुळे अवैध ठिकाणी मद्यसेवन करणाऱ्यांनादेखील चाप बसणार आहे.

संपर्क साधण्याचे आवाहन

देशको राजे उत्पादन डॉ. विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व हातभट्टी निर्मिती, वाहतूक, विक्री, तसेच धाबे, अवैध ताडी धंदे यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. अवैध मद्य निर्मिती, विकी, वाहतूक तसेच परराज्यातील मद्य, अवैध ढाबे, अवैध ताडी, विक्री विरुद्ध २१ पथकांमार्फत कठोर करण्यात येत आहे. नागरिकांना मद्य वाटप आदी संबंधी माहिती, तक्रार द्यावयाची असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ व राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग अधीक्षक कार्यालयाच्या ०२०-२६१२७३२१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी केले आहे.

# रुग्णवाहिकेची दुचाकीला जोरदार धडक, दोन जणांचा मृत्यू

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

राज्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक अपघाताची मोठी बातमी समोर आली आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावरून शिरुर येथील एका हॉस्पिटलमधून रुग्णाला पुणे येथे घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेची दुचाकीला जोरदार धडक बसली. या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णासह दोन नातेवाईक आणि अन्य तिघे गंभीर जखमी झाले आहेत. यात रुग्णाच्या एक नातेवाईक जागीच ठार झाला आहे. तर एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. घटनेनंतर रुग्णवाहिकाचालक फरार झाला आहे. याबाबत शिक्रापूर पोलीस ठाण्यात सौरभ संतोष महाजन या रुग्णवाहिका




चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथील पुणे- नगर महामार्गावरून एम एच १२ डब्ल्यू जे १७९५ या रुग्णवाहिकेने चालक सौरभ महाजन हा गुरुवारी (दि. १०) रात्री शिरुर येथील रमेश काशिनाथ राठोड या रुग्णाला घेऊन पुण्याच्या दिशेने चालला होता. दरम्यान, सणसवाडी रुग्णवाहिका चालकाचे नियंत्रण सुटून रुग्णवाहिकेची एम एच १२ १४ एम ५२८५ या दुचाकीला जोरात धडक बसून अपघात झाला. यात दुचाकीवरील गोविंद श्रीरंग पोळ व सुरज गणेश जगदाळे दोघांसह रस्त्या जवळील ऋषिकेश गणेश जाधव ((तिघे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) हे गंभीर जखमी झाले. तर रुग्णवाहिकेतील रुग्ण रमेश काशिनाथ राठोड, त्याचे नातेवाईक विकी रमेश राठोड, उषा रमेश राठोड (सर्व रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे) हे गंभीर जखमी झाले. तर रुग्णासोबत आलेला नातेवाईक सुमित बळीराम चव्हाण (वय २८ रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे) हा जागीच ठार झाला.

सर्व जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर शुक्रवारी (दि. ११) दुपारच्या सुमारास जखमी गोविंद श्रीरंग पोळ (रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत जगन्नाथ बबनराव खोपकर (वय ६१ रा. सोलापूर रोड फातिमानगर पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी रुग्णवाहिका चालक सौरभ संतोष महाजन (रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात

पुणे । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जन्मदिनानिमित्त पुणे स्टेशन परिसरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संविधानाचे शिल्पकार आणि देशाला प्रजासत्ताक बनवणाऱ्या या महामानवाच्या स्मृतींना उजाळा देताना उपस्थितांनी बंधुभाव आणि समतेचा संदेश जपला. बाबासाहेबांच्या विचारांतून प्रेरणा मिळते. त्यांच्या चरणी लीन होऊन बहुजन समाज एकत्र येतो आणि बंधुभाव वाढवतो, असे भावनिक उद्गार उपस्थितांनी काढले.



या अभिवादन सोहळ्यात शिवसेना पुणे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, राज्य संघटक वसंत मोरे, राजेंद्र शिंदे, उपशहरप्रमुख अमोल देवळेकर, भरत कुंभारकर, मकरंद पेठकर, उत्तम भुजबळ, युवासेना अधिकारी सनी गवते, विभाग प्रमुख राजेश मोरे, अनिल दामजी, भगवान वायाळ, प्रवीण डोंगरे, चंदन साळुंके यांच्यासह महिला नेत्या प्रा. विद्या होडे, उपशहर संघटिका रोहिणी कोल्हाळ, ज्योती चांदेरे, अमृत पठारे, करूणा घाडगे, विजया मोहिते, सोनाली जुनवणे, स्मिता पवार यांनी सहभाग घेतला. तसेच परेश खांडके, सोनू पाटील, अजय परदेशी, शंकर साठे, अनिल परदेशी, हनुमंत दगडे, शिवाजी मेलेकरी, सचिन घोलप, गिरीष गायकवाड, संजय गवळी, अमोल घुमे, नागेश खडके, बकुळ डाखवे, झुबेर तांबोळी, राहुल शेडगे, समीर खान, परवेश राव, विलास कथलकर, नितीन थोपटे आणि सूर्यकांत पवार उपस्थित होते.

या सोहळयात बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करताना संविधानाच्या मूल्यांना जीवनात अंगीकारण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. बाबासाहेबांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात एकता निर्माण करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.